डॉ. नितीन मोरे



# मेल्यानिया डायरी-3

# मेल्यानिया डायरी:

## काही पाने- भाग ३

## डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# मेल्यानिया डायरी: काही पाने- भाग ३

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ,
वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- १४ मार्च २०२६

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यतः आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे बासष्टावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

# मेल्यानिया डायरी: काही पाने

## भाग ३

## डॉ.नितीन मोरे





# मेल्यानिया डायरी: काही पाने भाग ३

## प्रस्तावना

तात्यांची धुवांधार बॅटिंग सुरूच आहे. राजकीय, आर्थिक चौकार षटकारांची बरसात सुरू आहे.

सारे तोंडात बोटे घालून पाहात आहेत. आपापल्या विचारानुसार कुणी कौतुकाचे शब्द तर कुणी शिव्या मोजत आहेत. मदमस्त हत्तीला कशाचीच फिकिर नसावी तसा हा गजगतीने ट्रंप कारकीर्दीचा गजराज झुलत आहे.

आपण फक्त पहावे. ते ही मेल्यानियाच्या नजरेतून. मेल्यानिया कौतुकादराने तात्यांचा एकेक फटका पाहात ही दुसरी इनिंग एंजाॅय करतेय.. डायरीतल्या ह्या नोंदी ठेवत!

तिच्या डायरीचा हा तिसरा भाग. ट्रंपतात्यांची कारकीर्द अजून तिला किती डायऱ्या लिहायला लावेल? कुणास ठाऊक!

आधीच्या दोन डायऱ्यांप्रमाणेच मेल्यानियेच्या या डायरीचेही स्वागत व्हावे ही अपेक्षा. ट्रंपतात्यांची कृपा झाली तर मेल्यानिया पुढेही तिच्या डायरीतल्या नोंदी लिहिती राहिल!

डॉ. नितीन मोरे

# मेल्यानिया डायरी: काही पाने

## भाग ३

अनुक्रमणिका

१. तात्यानचा तोफखाना

२. हिंगाचा इंगा

३. पांढ्रं घर

४. सृष्टीचा चमत्कार!

५. रगेल आनि रंगेल

६. नो-बेल

७. अंपायर नंबर वन!

८. तात्या नि सायन्स

९. मागा! मागा!

१०. व्हेनेझुएला: एक दगड दोन पक्षी

११. तात्यापन आणि हत्ती

# १.



## *तात्यानचा तोफखाना*

तात्यांना शस्त्रानची लय हौस. लय म्हनजे लय. तसं म्हने ल्हान व्हते तव्हाबी तसेच व्हते. दीपवाळीला म्हने तर खोटी बंदूक हाती यायची खोटी, त्यात टिकल्या भरून दुन्येची कत्तल कराया जायचे. तर शाळंतल्या नाटकातबी सदा सैनिक बनून लढाई करायचे. मंग याला मार न त्याला बदड. म्हनजे असं आइकून व्हती म्यां. येकदा म्यां इचारलेलं त्याबद्दल, तर म्हनलेले, 'ल्हानपनी

काय न आता काय, दुन्येवर बंदूक चालवत दुन्या वाचिवनं ह्येच माझं काम न्हाई का? उगा दुन्या कुनी तबाह करन्यापेक्षा म्यांच ती तशी केली तर?'

'या बया! तुम्ही न दुन्या तबाह करन्यासाठी बंदूक चालवनार?' म्यां चकित हून म्हनलेलं.

'तसं न्हाई गं माझे बाय. म्यां म्हनतो, कुनी दुन्या तबाह कराया यील तर हा सुपरम्यानच तिला वाचिवनार का न्हाई? धा लोकानला वाचविन्याचं असंल तर एखाद दुसऱ्याला बंदुकीचा धाक दाखवावा लागतो..'

तात्या न त्यानचं नसलेलं लाजिक. ते लाजिक न आजवर कधी मला दिसलं न उमगलं. पन असनार कायतरी न काय! तर सांगायचा पॉइण हा की तात्यानचं न शस्त्राचं लय जमतं.

पन आधी गंमत सांगत्ये ती एका कान्यामुळं किती फरक पडतो त्याची. म्हनजे शस्त्र नि शास्त्र दोघात एका कान्याचा काय त्यो फरक. पन तात्यानचा एकावर लय इश्वास न दुसऱ्यावर? शास्त्र म्हनजे एक थोतांड हाए म्हनतात तात्या. उगाच शास्त्र न काय न्हनतात ते, विज्ञान.. त्याचं ज्ञान कुनी सांगाया गेलं का तात्या कावतात. कुनी मागे म्हनलं, काय ते ग्यास न बिस सोडतात गाड्या म्हनून ही प्रुथ्वी तापते म्हने लय. त्यामुळं दुन्येभर लय गडबड हून ऱ्हायलीय. हे आइकून पह्यलं तात्याच तापले लय. उगाच काय बी. तशा तात्यानकडं चार सहा गाड्या हाएत. एक दोन इमानं. तात्या म्हनले मला, 'अगं गाडीच्या आत तर लय थंडगार असतं. उगा गाडीमुळे प्रुथ्वी गरम व्हते म्हनायला काय बी लॉजिक न्हाई! म्या तपासून पाह्यलंय सोत्ता!'

तात्या म्हनतात म्हनजे खरंच असाया हवं ते. 'शास्त्र म्हनजे अंधश्रद्धा, मेल्यू. उगा लोकानी शास्त्र न त्या शास्त्रज्ञ लोकानला डोईवर चढवून ठेवलं. साधं लाजिक. कुनी म्हनेल दिस उगवायला न रात व्हायला बी कारन असतं. मंग ते काय काय नियम सांगनार. सुर्य न चंद्र कशे फिरतात असलं काहीबाही. म्यां म्हनतो ते येकच, हे काय ते नियम न बियम तुम्ही कुनाला आइकवताय? सुर्याला न चंद्राला आइकवनार हाएत का? त्यानला ठावं न्हाई तरीबी फिरतात त्ये का न्हाई? मंग कशाला नस्ती उठाठेव? उगा हे लोक सोत्ताला लय शाणं समजतात न काय!'

म्यां तर म्हनते तात्यानवानी शाणा कुनी न झाला न व्हईल.

तर सांगत व्हती ते शस्त्रांबद्दल. सुरी न सुरा, तर्वार न खंजीर, गदा न बंदुका, त्यांच्या गोळया न तोफांचे गोळे.. तात्यानला समद्यात लय इंट्रेस. तात्या म्हनतात, 'शस्त्रानं गंज नको खाया. ती बनवायची न वापरत ठेवायची. साधी सुरी घे. वापरत न्हाई ठेवली तर भेंडी बी कापली जायाची न्हाई. तर तर्वार गंजली तर शत्रुची मानगूट कापली जाईल का तिच्यानं मंग मनगटात कितीबी ताकद का असंना? शस्त्रं कशी सदा तयार हवीत. सुपरम्यान म्हनून ती जिम्मेदारी घ्यायाला हवी का न्हाई? मंग ती बनवायची बी जिम्मेदारी न इकायची न वापरात ठेवायची बी जिम्मेदारी. समदी माझीच. त्याकरिता कुठं कुठं कलागती लावायचं काम बी माझंच न ते सोडवून समद्यांना गपगार करायचं काम बी माझंच! सुपरम्यान हाए म्यां. इत्कं तर करनारच ना!'

तर असं हाए तात्यानचं. सुपरम्यान म्हनजे फकस्त आतली चड्डी भाएर घालनं न्हाई! त्यानला शांतता लय आवडते, पन म्हनतात, 'लढाईनंतरच तिचं महत्व लय वाढतं. तव्हा लढाई व्हायाच हवी, म्हंजे अंपायरचं महत्व लोकानला कळंल न काय!'

तात्यानचं हे असं हाए. लोकानला भाएरनं दिसंल ते ह्येच. सुरे न तर्वारी, गदा न भाले, तोफा न बंदुका तयार करून दुन्येभरात इकनारे तात्या. त्यानला तर शस्त्राच्या बळावर असलेली शांतता लय आवडते. अगदी पांढ्री कबुतरं उडवाया बी आवडतात. त्यासाठी ती पकडायची न मंग सोडायची आकाशात न काय! कबुतरांची बी येक गंमत झालेली मागे. गंमत म्हनजे काय..

पुऱ्या दुन्येत तात्या लय फेमस न समदी दुन्या त्यानला मानते लय. घाबरते बी लय. पन ह्ये मानसांपुरतं. उद्या कुन्या मच्छराला चावायचं तर त्यो थोडीच डरनार हाए तात्यानला? तसंच कबुतराचं. तर तात्या कबुतरं पकडन्याची आरडर देतात. पकडायची कशासाठी? तर सोडन्यासाठी! हे एक आक्रित! म्यां म्हनते मोकळी सोडायचीच हाएत तर आधीच मोकळी असनारी कबुतरं पकडायचीच कशापायी? पन ते येक ऱ्हाऊ द्या. सांगत व्हती ते कबुतराबद्दल. ते येक पांढ्रं फेक कबुतर व्हतं. त्यानं काय करावं? तात्यानला काय तो वळखतो का तो काय जाणतो की दुन्येतल्या एक सर्वात पावरबाज मानसाच्या हातात हाए तो? तर तात्या त्याला सोडनार तेवढ्यात त्याला जोराची आली असनार. तर उडवता उडवता तो शिटला की. तात्यानचा तो लय महागातला पांढराफेक सूट खराब झाला. शांततेचे पाईक तात्या लय अशांत झाले. पन करनार काय? येकतर

कबुतर उडून गेलेलं न एरवी बंदुकीच्या छर्‍यांनी टिपलं बी असतं पन शांततेसाठी सोडलेलं कबुतर व्हतं त्याला मारलं तर समदा शो बिघडला असता न्हवं?

पन इशय हा न्हाई! म्यां एकदा सांगाया बसली की येकातनं दुसरं आठवाया लागतं न काय!

इशय हा की तात्यानचं आवडतं न सर्वात धारदार शस्त्र! तोफखानाच म्हना की!

येकदा म्यां म्हनली तात्यानला,

'काय वो? इतकी समदी शस्त्र हाएत तुमचं आवडतं कुठलं?'

यावर ते म्हनले, 'वळख पाहू तू..'

हे येक मला आवडत न्हाई. वळख कशापायी? उगा डोस्क्याला ताप न काय! पन काय करते?

'तर्वार असनार. सपासप आवाज करती ती..'

'न्हाई..'

'मंग गदा?'

मला लय वर्षापूर्वीचं आठवलं. कुस्तीच्या स्पर्धेपायी गर्दी जमलेली लय. तात्या त्यात मुख्य पाव्हणे. त्यात जितलेल्याला गदा द्याची व्हती तात्यानच्या हातानी. तात्यानी ती लय पिरमानं उचललेली. म्यां इचारलं, 'का वो, ती इत्की जडबदक. कशी उचलली तुम्ही?' त्यावर तात्या लय हासले. लय हासले न

म्हनले, 'तुला इत्कं बी कळंना माझे बाय? अगं.. थर्माकोलची गदा व्हती न काय!'

असंल. राजकारनी लोक दाखवन्यासाठी न दाखवन्यापुरतं कायबी करू शकतात का न्हाई?

म्यां म्हनलं तात्याना आवडत असनार ती तोफ. तोफच असनार.. मंग म्या म्हनली, 'मला ठावं हाए. तोफ आवडते तुम्हाला. मुलुखमयदान तोफ!'

'ह्ये बरीक खरं वळखलीस. तोफच! पन सांग तर कुनच्या टायपाची?'

'या बया! आता तोफेत बी टाइप असत्यात ह्ये मला अडानी बाईला काय ठावं? असनार तोफेवानी तोफ न काय!'

'अगं, तुला ठावं हाए ना, मानूस जित्की इजा तर्वारीनं करतो त्यापरीस जास्त बोलून करू शकतो. शब्दाचा मार लय कठीन बसतो माझे बाय. बोलावं कसं मानसानं? कुनाची भीड न मुर्वत ठिवू नये. सपासप तर्वार चालते तशी जीभ चालिवतो म्यां. कुनाला गदा काय बसंल डोईत, म्यां बोललो की डोस्कं फुटतं कुनाचं.'

हे बरीक खरं. तात्यांच्या त्वंडात जीभ न्हाई तर कोयता हाए जनू. तर्वारीसारखी धार असनारा. तात्या बोलत सुटले की भले भले बी गारद झाल्याबिगर ऱ्हात न्हाईत.

'तर माझे बाय, मला आवडतो तो माझ्या त्वंडाचा तोफखाना. मुलुखमयदान आक्शी. म्यां बोलाया लागलो का तोफगोळे सुटतात जनू त्वंडातनं. येक येक मानूस नुसतं आयकून गपगार पडायाच पाह्यजे न काय!'

तर हे आसं हाए. तात्या न त्यानची शस्त्र न अस्त्रं. त्यातलं समद्यात धारदार न असरदार.. त्यानचं त्वांड. त्वांड कसलं, तोफखाना जनू. जनू कशापायी? तात्याच म्हनले न्हवं.. तोफखानाच तो. समद्या दुन्येत तहलका घडवनारा न समद्या दुन्येला ज्याचं भ्या वाटतं त्यो.. तात्यानचा तोफखाना!

कुनी म्हनंल, म्यां कशी त्या तोफांच्या माऱ्यापास्नं सुटलीय? तर तसं काय बी न्हाई. घुश्श्यात असले की तात्या बोलत्यात काहीबाही. पन येक दुन्येला ठावं असलेलं शिक्रेट हाए. गावभर नवरा कितीबी फिरला वाघावानी, घरला बायकोपुढं शेळीवानी व्हनार म्हनजे व्हनारच! दुन्येचाच नियम हाए! तात्या भले दुन्येतल्या बाकी नियमानला अपवाद असतील पन ह्या नियमाला न्हाई बरं अपवाद! तरीबी तात्या न त्यानचा तोफखाना.. म्यां घरात बसून आइकते न मला कवतिक वाटतं..

- त्यानचं नव्हं, माझंच.

इत्क्या वर्षापूर्वी भाळलेली म्यां इत्की वर्ष सांभाळतेय त्यानला अजूनबी! माझं मलाच कवतिक तर वाटनारच का न्हाई?

# २.



## *हिंगाचा इंगा*

दुन्येभरात लय गावं हाएत म्हने. कुठंकुठं लोक ऱ्हातात न कसेकसे ऱ्हातात कुनास ठावं. म्यां तर म्हनते वॉशिंगटन सोडलं तर दुसरं कायबी जगात मोठं न महत्वाचं न्हाई. हितंच समदं काही असताना दुन्येतल्या गावांची कशाला पंचायत करायची कुनास ठावं. म्यां म्हनलं तात्यानला, तर म्हनाले, 'अगं आपन लय मोठे. लय म्हनजे समद्या दुन्येत. तर सुपरम्यान म्हनून दुन्येची काळजी घ्यावी लागते का न्हाई. मोठं व्हायचं तर लय काम करावं लागतं का न्हाई? जया अंगी मोठेपन तया यातना कठीन!'

या बया! तात्यानच्या मुखी अन असली भाशा? उद्या तर डायरेक संतावानी संतवानी म्हनतील. तात्या अन संत! कसं वाटंल न्हाई? पन ते म्हनतात

तर असंल बाई. फकस्त नाव मोठं न लक्षन खोटं न व्हावं म्हंजे बरं, व्हय का न्हाई? तात्यानचं बी तसं बरोबर हाए म्हना. दुन्येतल्या समद्या गावात ताकदवान सुपरम्यान. त्यानला जगभर ध्यान द्यायाच पाह्यजे.

पन आजकाल थोडं आक्रित झालंय म्हना की. म्हंजे विलेक्शन जितून इकडं आलो त्यानंतर. तात्या तसे मूड मध्ये असतात, न्हाई असं न्हाई. पन रोजरोज असे डोस्क्याला हात लावून बसलेले पाह्यले. एकलेच. म्यां म्हनलं बी, 'भरल्या घरात असं न्हाई बसू. त्वांड पाडून बसलं तर लक्ष्मी परत जाते. संध्याकाळच्या वक्ताला असं बसनं बरं दिसतं का?'

त्यावर तात्या कायबी बोलले न्हाईत न उठून गेले. काय बिनसलं कळंना. म्हनलं, काय झालं बाई..

तात्या आले परत न म्हनले, 'या दुन्येचं कायबी खरं न्हाई. काय येक येक गावं हाएत. म्यां न्हाई आइकनार. न्हाई चालवून घेनार आरेरावी या लोकानची..'

हे लोक कोन? म्यां इचारलं न्हाई न तात्या बोलले न्हाईत. पन ह्ये बारबार व्हाया लागलं.

मधनंमधनं तात्या बोलाया लागले, 'मेल्यू, ह्या लोकानला म्यां सहन करतो पन अजून माला तरास दिला ना..'

येकदा म्हनले, 'च्या मारी! लय माजले. म्यां काय असातसा वाटलो का काय?'

'या लोकानला न्हाई धडा शिकवला ना तर नाव न्हाई सांगनार..'

मंग येक दिवशी त्यांनी हे लोक कोन ते सांगितलं. म्यां लय चकित झाली. ते दूर कुनीकडचं गाव हाए इंड्या नावाचं. तसं दोनचारदा नाव आइकलेलं म्यां. मागच्या येळंस विलेक्शनीत तिकडल्या सर्पंचानं म्हने तात्यानसाठी फिलडिंग लावलेली. असंल. पन तात्या आता त्यानच्यावरच डाफरत्यात म्हनजे. कायतरी बिनसलं असनार! तसं बिनसायला काय, त्या इलॉनभौशी न्हाई बिनसलं? कुनाशीबी कधीबी कुठल्याबी कारनानं बिनसू शकतं का न्हाई?

इंड्या नाव तसं ठावं मला त्ये तात्यानला ढोकळा न फाफडा लय आवडतो म्हनून. तात्यानी तिकडे इमानं भरभरून लोकानला पाठिवलं परत तर म्यां तिकडून येक खानसामा बोलावून घेतलेला. खास. तात्यानला खायाची आरडर द्याया लय आवडतं. हापिसातनं येतील न म्हनतील, हून जाव दे वॉशिंगटन बरगर! म्हनजे वडापाव! कधी म्हनतील, आज बनव मसालेदार पावभाजी. अशा मासलेवाइल मानसाला अजून मसालेदार कशाला हवं कुनास ठावं. जिलबी फाफडा न ढोकळा तर रोजच लागतं खाया. हे समदं इंड्यातलं हवं न आता इंड्यावर कावायला काय झालं असंल? असनार कायतरी. आगळीक केली असनार त्या इंड्याच्या लोकानी. नायतर तात्या असे धुमसले नसते इत्के दिवस न काय. तात्यानचं काय पन, कितीबी धुमसले ज्वालामुखीवानी तरी खानं काय सोडायचे न्हाईत.

"तुला सांगू मेल्यू, त्येच त्येच बरगर न कायकाय खाऊन कटाळा आल्ता. ते इंड्यातलं खाया मिळालं न जिभेची चवच लय बदलून गेली. लय परकार न असली चव.. मानूस जगतो कशापायी?"

या बया! तात्या न तत्वज्ञान? ही असली जोडी जमंल असं कुनाला स्वप्नात बी वाटनार न्हाई न पटनार न्हाई. मानूस जगतो कशापायी हा इचार तात्यानी करायचा हाए का? जगातले बिनकामाचे तत्वज्ञानी बसलेत ना जगाचा अर्थ लावाया! लावतील काहीबाही अर्थ, पन काम सोडून तात्या ते कराया बसले तर अनर्थच व्हायचा का न्हाई? मंग तात्याच पुढं म्हनले, "मानूस जगतो खान्यासाठी. म्यां तर म्हनतो जीभ हा मानसाचा समद्यात महत्वाचा अवैव हाए."

खरंय! बोलनं न खानं ह्येच तात्यानचं जीवन हाए का न्हाई? पन ह्याचा इंड्यावर कावण्याशी काय संबंद कुनास ठावं.

"म्यां म्हनतो, खाया गावतं समदं पन तरीबी हवं तसं न्हाई.. ढोकळा कसा हवा?"

"का वं? खानसाम्याला काढून नवा आनू? बलावते नवा कुनी तरी.. ढोकळा स्पेशालिस्ट!"

म्यां म्हनली खरी पन मला ठावं न्हवतं असं कोनी एकेका पदार्थाचं स्पेशालिस्ट असतात का न्हाई ते. तात्या म्हनले हो तर काय करनार?

"न्हाई गं बाई. ती त्याची चूक न्हाई. समदा इंड्याचा चावटपना न काय!"

ढोकळा न इंड्याचा चावटपना? मला कायबी टोटल लागंना.

"अगं ढोकळा कसा हवा?"

"म्यां काय सांगनार. पिवळा न नरम. लुसलुशीत आपल्या पाळलेल्या सशावानी.." म्यां म्हनली न जीभच चावली. कुठं तात्यानला त्या माझ्या लाडक्या सशाचं कटलेट खायाची विच्छाबिच्छा नको व्हाया.

"अगं, धा बारा दिसांपासून बघतो, ढोकळ्यावर फोडणी तर हाए.. समदं ठीक. राई बी न त्येल बी.."

"मंग वो?"

"पन फोडणीत हिंग कमी हाए. जनू न्हाईच! म्यां म्हनलं येक दिस नसंल, दुसरा दिस नसंल. पन किती दिस अशी हिंगाविन फोडणी?"

"संपलं का हिंग? खानसामा बोलला न्हाई.."

"त्याला बोलून काय उपेग? म्यां समद्या मंत्रीलोकानला कामाला लावलं. म्हनलं हिंग का कमी पडतो याची हून जाव द्या चवकशी. येकदम हाय लेव्हल.."

"मंग वो?"

"मंग काय? त्या लोकानला परत पाठिवलं तर इंड्यातल्या लोकानी हिंग पाठवनं बंद केलं नव्हं." "म्हनजे हिंग लावून इचारनार न्हाईत म्हनतात का काय?" म्यां हे बोलाया नको होतं. तात्या भयानक चिडले. त्यांचा गोरा गोरा मुखडा लालेलाल झाला. म्हनले, "न्हाई दाखवला हिंगाचा इंगा तर नावाचा डोलांड न्हाई!"

डोलांड? तात्यानची जीभ सोत्ताचंच नाव घेताना घसरली. तशी सवै हाए त्याना!

'जीभ काय घसरन्यासाठीच असते मेल्यू! मानसानं मनात कायबी ठेवू नये. बोलावं बिनधास नायतर जीभेचा उपेग तो काय?' ते एकदा बोललले मला.

आता तात्या काय करनार? फोडनीत हिंग कमी म्हनून असली चिडचिड चाललेली म्हनजे. तात्यानचं कशावरनं काय न कधी बिनसेल सांगता यायचं न्हाई. गेल्या इस वर्षात मला बी कळलं न्हाई तर इतरांनला काय कळनार?

"मंग आता काय करनार तुम्ही? हिंगाचा इंगा म्हनजे?" म्यां इचारलं तर तात्या म्हनले,

"म्हंजे वाघाचे पंजे!"

म्यां अजून काय इचारलं न्हाई. त्या इंड्यावाल्यांना काय अवदसा आठवली बया की हिंग पाठवेना झाले? ते तारीफ का काय लावलं म्हनून तर नसंल? तात्यानचं काय, इंगा दाखवन्यासाठी पिंगा घालाया लावतील न काय? न्हाईतर दंगा करतील की न्हाई?

दोनचार दिस गेले असतील. तात्या परत लय खुशीत आलते. म्हनलं, झालं असंल समदं वेवस्थेशिर न काय. हिंग मिळालं, कां कुनी हिंग लावून इचाराया लागलं म्हनून ते खुशीत आले? म्यां मनाशी म्हनलं, कुनाच्या बी कोंबड्यानं का व्हईना उजाडन्याशी मतलब न काय! तरीबी म्यां इचारलंच, "काय वो? आजकाल लय खुशीत गाडं? ढोकळा पहिल्यावानी मिळाया लागला की काय?"

"न्हाई, पन मिळंल. म्यां एकेकाची खोड अशी मोडतो ना की समदे लायनीवर यायलाच पाह्यजेत न काय!"

"म्हनजे?"

"वाघाचे पंजे! म्या लय कडक पत्र लिव्हून धाडलं. पार तिकडे कबुतराकडनं. कबुतर तर तुला ठावं हाए.. बाकी कुनाचा भरोसा न्हाई पन कबुतर टायमात डिलिव्हरी करतोच का न्हाई?"

"या बया! तुम्ही बी असले. आपल्या धाकलीच्या येळेला न्हवतं ठावं. डिलिव्हरी टायमात झाली असती न माझी बी जलदी सुटका झाली नसती?"

"मेल्यू.. ती डिलिव्हरी अलग न ही अलग.."

असंल बाई अलग. तात्या म्हनतात तर असनारच.

"त्ये पत्र तिकडे इंड्यात पोचलं असनार. तिकडं येकच गोंधळ झाला असनार.."

"असं काय लिव्हलंत पत्रात?"

"काय लिव्हलं? अगं, म्यां लिव्हलं, नाय धाडला डबा भरून हिंगा तर घालिन पिंगा अन करीन दंगा. तुम्हाला ठावं न्हाय माझा इंगा!"

पाहा! म्यां म्हनलं तसंच, पिंगा अन दंगा, इंगा दावाया! म्यां वळखते की त्यानला लय वर्षापास्नं चांगलीच.

मंग तात्या सोत्ताच बोलाया लागले, "इंड्या लय मोठं गाव. साता समुंदरापल्याड."

"त्येच की जे बंदुकीच्या गावासंग मारामारी केलती.."

"त्येच. गाव मोठ्ठ हाए. तिकडनं लोकं काय आले का मला तिकडचंच जेवान ग्वाड लागाया लागलं. फाफडा न जिलबी, ठेपला न ढोकळा.."

"लय शिरमंत दिसत्यात न्हवं.. खान्याचं इतकं समदं.."

"कसलं काय गं मेल्यू. गाव मोठं हाय पन तिकडं गरीबी लय. समदे सर्पंच व्हायच्च्यासाठी एकच घोशणा देत्यात, गरीबी हटाव. म्हनजे बघ. आली विलेक्शन का हटाव गरीबी. मला वाटतं पाचशे वर्षापासनं हटवताएत गरीबी तिकडले सर्पंच.."

पाचशे वर्षं? असंल बी. तात्यानचा न इतिहासाचा तसा संबंध न्हाई म्हना. म्यां मागे येकदा म्हनलेली त्यानला, 'काय वो, इतिहासाबद्दल तुम्ही काय बी ठोकून देता..' तर तात्या हासलेले. म्हनलेले, 'म्यांच न्हाई काय, समदे मोठे पुढारी लोक दुन्याभरचे असंच करत्यात. अन काय हाए ना, आमच्च्यासारख्यानला इतिहासात अडकाया आवडत न्हाई. अन म्यां काय करतो ना, जव्हा जिथं सोयीचा तसा इतिहास. इतिहास आपल्यासाठी हाए, आपन इतिहासासाठी न्हाई! अन गंमत ही की, आपला भूतकाळ सदा लय चांगलाच असतो न भविष्यकाळ बी. फकस्त वर्तमानाचा जरा प्रॉब्लेम असतो का न्हाई! त्याकरता तर तिथे सर्पंच म्हनून म्यांच पाह्यजे सांगायचं पब्लिकला..'

ह्ये खरंय. म्यां पाह्यलं व्हतं. विलेक्शनच्या टायमाला तात्या असंच बोलायचे. वॉशिंगटनाला परत ग्रेट बनवायचं.. म्हनजे आधी ते ग्रेट व्हतं, आता ग्रेट ऱ्हायलं न्हाई.. पुढं जाऊन ग्रेट बनवायचं!

"पन मंग इत्क्या वर्षात गरीबी हटली असंल का न्हाई तिकडली?"

"यडी का खुळी तू? न्हाई म्हंजे बघ, हटली गरीबी समज, तर पुढल्या विलेक्शनीत परत काय हटवनार? असं असतं बघ राजकारन्याचं आयुश्य. राजकारन्याला असं करावंच लागतं का न्हाई?

बोलावं लागतं लय नि काहीबाही. लोक बी ना आइकतात न खरं मानतात. म्यां म्हनतो चूक लोकानचीच का न्हाई? उगा इश्वास ठेवतात न काय!"

असंल बाई. तात्या म्हनतात तर चूक लोकानचीच असंल न काय. मागच्या टायमाला हारलो आम्ही तर बी चूक लोकानचीच व्हती न काय. शिक्षा भेटली ती आम्हा लोकानला.

पुढं काय झालं ठावं न्हाय नक्की. पन एक दिस लय मोठं पार्सल आलं. लय मोठा खोका व्हता. म्हनलं हे काय? तर हिंगाचे डबे व्हते लय सारे.

"इत्कं सारं हिंग? आयुश्यभर पुरून उरंल की वो?" म्यां इचारलं.

"तर! खास त्या बंदुकीच्या देशातनं, पाकिस्तानातनं मुनीरनं धाडलंय. भेट म्हनून. खास अफगाणिस्तान नावाच्या गावातला हिंग हाए. नंबर येक! म्यां

निस्ता शब्द टाकला न त्यानं दिला धाडून न काय! कशाला हवी इंड्याची मिजास?"

मुनीरभौ हल्ली तात्यानचा लय लाडका झालाय खरा. आलाता मध्ये मटणरस्सा खाया पांढ्र्या घरला. त्यानं सोत्ताहून बंदुकीनं बोकड मारला. न खानसाम्यानं शिजवला. मुनीरभौ तसा बरा हाए.. पन त्ये म्हनतात ना, दुरून डोंगर साजरे तसा नसावा म्हनजे बरं न काय!

आता तात्यानच्या ढोकळ्यावर रोज हिंगाची फोडनी पडल्याबिगर ऱ्हात न्हाई. तात्याबी लय खूश. म्हनलं, येक ते हिंग फोडनीत कमी पडलं तर इंड्याशी पंगा घेनारे तात्या.. कुनी म्हनेल हे बरं हाय का? म्यां म्हनते, सुपरम्यानला समदं काही शोभून दिसतं न काय! मंग ते पंगा घ्यू दे की इंगा दावू दे! अन तो साध्या हिंगावरनं का असंना!

तात्याना हे म्हनलं तर ते म्हनतील, 'म्यां दंगा करंन न इंगा दावीन.. कुनी काय बी म्हनो. अरं, सुपरम्यान म्यां. म्यां फकस्त म्हननार.. माझ्याशी कुनी नका घ्यू पंगा!'

# ३.



## पांढ्रं घर!

तसं म्यां लय आइकून हाए. म्हनजे राजेशाही पास्नं बालुशाही परेन्त. न्हाई, म्यां गंमत न्हाई करत. तशी म्यां समदं आइकून समजून असते. तसा येळ गावतो कधीकधीच पन ध्यान चारी बाजूला ठेवत असते म्यां. तशी सवै तात्यानीच लावली का न्हाई. म्हनजे मुद्दाम म्हनून न्हाई, पन तात्यानबरोबर ऱ्हायचं तर समदीकडं पाहावं लागतंच का न्हाई? तात्यानचा काय भरोसा? म्हनतात, म्यां तिसरी न शेवटची, पन तरीबी बाईच्या जातीला तसं डोळे मिटून ऱ्हाणं पर्वडत न्हाई. त्यात गावोगावी फिरनारे तात्या. त्यानच्यासारख्या राजबिंड्यानवर

कुनाबी बाईचा डोळा जानारच का न्हाई? त्यात परत हे सुपरम्यान! तव्हा म्यां ध्यान ठिवून असते. कुनाची नजर नको पडाया न काय! इटालीवाली मेलोनी तर मांजरीवानी दिसते मला. तशाच हायेत अजून दोनचार गावोगावी. अन गावोगावी कशाला? इकडं हापिसात बी काय कमी बाया हाएत? तात्यानचा डोळा तसा चुकायचा न्हाई. पन म्यां काय म्हनते, तात्या हाएत तसे शक्तिमान पन म्हनून त्यानच्या मागं लागायच हवं असं न्हाई ना? अन तात्यानचं बी काय चुकलं मंग? पन इशय तो न्हाई. माझं ध्यान सगळीकडं ऱ्हातं या अशा कारनानं हे सांगत व्हते म्यां. म्हनजे या पांढ्र्या घरापास्नं ते भाएरच्या समद्या गावापर्यन्त. फस्स लेडी म्हनलं म्हनजे हे समदं आलंच न काय.

तर इशय व्हता शाही बद्दल.

म्हनजे इकडं तशी लोकशाही हाए. लोक म्हने जनू राजाच. त्यानला हवा तो राजा निवडनार चार वर्षासाठी. चार वरीस का लय असतात? यून बुड स्थिर व्हईतोवर एक वर्ष निघून जातं न पुढल्या विलेक्शनीपायी शेवटलं एक. मग मानसांनं काम कधी करावं? पन तात्यानला हा प्रश्न पडत न्हाई म्हना. कारन? कारन येकच तात्यानचा कारभारच शाही म्हना की!

त्येच म्हनते म्यां. लोकशाहीत बी शाही कारभार करता येनं महत्वाचं. म्यां विलेक्शनीच्या टायमाला म्हनलेली तात्यानला, 'का वं? हे विलेक्शन विलेक्शन

म्हनजे डोस्क्याला ताप हाए न्हाई? मागल्या येळंस निवडून आलो न चार वर्षात म्हने फुटा न परत निवडून या. बिडेनभौनं चिक्कीखाऊपना केला न्हाईतर..'

'अगं मेल्यू डार्लिंग, लय इचार करू नगंस. म्यां हाए ना! लोकशाहीचा फायदा बी हाए न नुस्कान बी. फायदा हा की आता आपन परत पांढ्र्या घरात जाऊ शकतो तो हिच्यामुळंच का न्हाई? अन नुस्कान म्हनावं तर.. चार वर्ष झाली की परत लोकानला इचारा.. बाबांनो कोन हवा तुम्हाला राजा? ह्ये जरा जादाच व्हतं. येकदा आलो की ऱ्हावं आठ-धा वर्ष न काय? पन न्हाई. लोकशाही म्हनलं की समदं सहन करावं लागतं. पन तू चिता करू नको. लोकशाही असली तरी या तात्याचा कारभार फकस्त शाही..'

ह्ये तर खरंच हाए. ग्रांपंचायत हाए निस्ती पन कारभार कसा? भाएर दिमतीला इमानं उभी. येक न्हाई, तर हल्ली तात्यानला भेटलेलं नवीनवालं बी. तात्यातर बाजारला जायचं तरबी ते मोठालं धूड घ्यून जायचं म्हनतात! लहान मुलाचं खेळनंच जनू काय! पन तिकडं इमान कुठं उभं करनार? तरीबी हौस लय. आनि हे. पांढ्रं घर! ते तर राजेशाहीच म्हना की. किती खोल्या न किती दारं! मागं येकदा ते गानं बोललेली म्यां, आठशे खिडक्या न नौशे दारं.. कुन्या वाटंना बा गेली ती नार.. तर तात्या लय खूश झालते. म्हनलेले, वा! इतक्या खिडक्या न दारं तर नारी किती असाया पाह्यजेत! म्यां काय बोलली न्हाई, पन पुन्यांदा ते गानं कधी बोलली न्हाई.

मागच्या खेपेला इकडं आलंतो तर समद्या रूमा बी उघडून पाह्यल्या न्हवत्या. इत्कं मोठं घर. राजेशाही महाल म्हना. तसं तात्यानला म्हनलं तर म्हनतात, 'अगं काय उपेग हाए त्याचा!'

म्यां म्हनलं, या बया! काय एकेक कोड्यात बोलनं त्ये. मागच्या येळंस हारले तर ह्ये घर सोडाया तयार न्हवते. भाएर गेलो तरी सा आठ म्हयने स्वप्नात यायचं तात्यानच्या हे पांढ्रं घर. परत इथं येन्यासाठी तर अट्टाहास व्हता. त्यासाठी काय काय न्हाई केलं. अगदी बंदुकीची गोळी बी सहन केली. लोकानला काय काय खरंखोटं सांगितलं. वॉशिंगटनाला परत ग्रेट बनवायचं म्हनजे काम सोपं न्हाई. त्ये बी करन्याची ग्यारंटी दिली. मस्कभौच्या संगतीनं गल्ली न बोळात फिरले, भाशणं बोलले टेस्लाच्या टपावर उभं ऱ्हाऊन. म्यांबी तशी भाशणं ठोकली. त्यात म्हनलं, इतके ग्रेट हाएत तात्या. म्यां आन्भवावरनं सांगतीया. इतकं समदं केलं इकडं यायला न तरीबी तात्या म्हनतात पांढ्र्या घराचा उपेग न्हाई? काय म्हनावं या मानसाला?

'का वं? उपेग न्हाई म्हनजे काय?'

'म्हनजे काय? अगं हे घर समदं हाए मोट्ठं. म्यां तर समद्या खोल्या बी अजून पाह्यल्या न्हाईत. असला राजवाडा हाए पन त्याचा उपेग काय?'

'काय असं कोड्यात बोलनं ते?'

'कोडं न्हाई न खोडं न्हाई. म्यां काय न्हनतो, हे लय छान घर हाए. पानी न लायटीचा प्रॉब्लेम न्हाई. चोवीस तास नळाला लाईट न चोवीस तास पान्यावर चालनारे पंखे..'

यावर म्यां हासली. तर म्हनले, 'हसाया काय झालं? हितं काय म्यां नाच करून ऱ्हायलो?'

तात्या नळाला लाईट येतो म्हनले न पंखे पान्यावर चालवाया निघाले! करतील बी! तात्याच हाएत ते!

'काय न्हाई वो. उगा आपलं.. पन हे पांढ्रं घर खास न्हाई म्हनतात ते काय..?'

'तसं न्हाई गं माझे बाय! घर लय सोन्यावानी हाए. तू ठेवलं बी हाएस चुना मारून मारून पांढ्रं शुभ्र. पन हे ग्रांपंचायतीला ग्रेट बनवायचं तर माझी पंचायत व्हते ना!'

'म्हंजे वो?'

'वाघाचे पंजे! अगं म्यां बिझी किती पाहते ना? म्यां आलो न दुन्येभर कुठं न कुठं लढाया सुरू करायच्या न बंद पाडायच्या ह्येच काम. मग ते तारीफचं काम. कितीबी गानं बोललं, तारीफ करूं क्या इस्की तरीबी काम तर पडतयंच का न्हाई? लोकानला शोधून परत धाडायचं आपापल्या देशात ते काम.. त्यात मग त्या पुतीनला सांभाळा, झेलेन्स्कीला झेला, मुनीरला चार गोड गोष्टी बोला

न असलं काय काय! परत त्ये नोबेल मिळेल? बात न्हाई! काम न काम न काम! लय बिझी म्यां.

काय काय करनार म्यां. त्यात म्हनलं चार घटका बसू घरला नि बायकोबरोबर मारू पिरमाच्या गप्पा तर येळ कुठं हाए मला? म्यां बिझी इत्का. म्हनून म्हनलं, असंल हे पांढ्रं घर मोठा राजवाडा पन मला तेचा काय उपेग?'

'असं म्हनायचं तुम्हाला! मला वाटलं असं काय झालं..'

तर ह्ये असं हाए.

तात्यानला हौस तर लय. अगदी लगीन झाल्यावर बी बोललेले, 'मेल्यू, म्यां हाए पक्का व्यापारी. सगळ्यात चांगला व्यापार कुठनं करता येतो ठावं हाए?'

'म्यां काय सांगनार? अडानी बाई म्यां. वॉर्डिनरी!'

'न्हाई! माझी लाडकी बाईल अन वॉर्डिनरी? तू स्पेश्यल हाएस! व्यापार कराया बेस जागा म्हनजे पांढ्रं घर! म्यां एक न एक दिस त्या पांढ्र्या घरात जानार. जानार म्हंजे जानारच!'

'म्हनजे? काय सर्पंचबिर्पंच व्हनार का काय? अन आपला पर्पंच? त्याचं काय?'

तात्या लय जोरात हासलेले. म्हनले, 'सर्पंचच!नायतर काय? म्यां काय पेंटर बाबू हाए? पांढ्र्या घराला काय चुना लावाया जाईन तिकडं?'

तर तात्यानच्या डोस्क्यात ही आयडिया कधीपास्नं व्हती हे खरं.

'अन तू येशील फस्स लेडी म्हनून! हाएस कुठं!'

'कुठं असनार? इकडं, तुमच्या कुशीत!'

नवं नवं लगीन व्हतं तव्हा सुचायचं असलं काहीबाही रोमँटिक न काय!

नंतर काय झालं समद्याना ठावंच हाए. मागच्या खेपेला पांढ्रं घर चार वर्ष लाभलं. उगा ती विलेक्शन हारलो तर तात्या भाएर पिंपळाच्या पारावर बसून पत्ते कुटत बसले चार वरीस. आता परत ह्येच! ह्येच पांढ्रं घर नि परत म्यां फस्स लेडी. फकस्त येक झालंय, बिडेनभौचं ध्यान नसंल घराकडं तर भिंती काळ्या पडलेल्या. इकडं तिकडं हाताचे डाग बी. बिडेन तरी काय करनार? म्हातारपनी भिंतीचा आधार घ्यून चालत असनार. डाग तर पडनारच का न्हाई? पन तात्यानचं टाळकं सटकलं. म्हनले, 'मेल्यू, तुझ्याकडं येकच काम. बाकी काय कर का नको, गावच्या जत्रंला जाशील का न जाशील.. किचनचं बी खानसामा बघून घ्यील. तू फकस्त हे पांढ्रं घर पांढ्रंच ऱ्हाईल ना एवढं बघायचं. समदं घर कसं लखलखीत असाया हवं, दुधावानी सफेद!'

म्यां न करून कुनाला सांगते? तात्या नावाच्या सुपरम्यानची ऑरडर हाए ती. आता दर आठौड्याला पेंटर येतो न चुना लावून जातो! तात्या एकदा गमतीत बोललेले, 'भाएर दुन्येला म्यां चुना लावतो.. घरचं तू बघ!'

तर हे असं हाए. म्यां इचारलं तात्यानला, "इत्कं काय ते पांढ्र्या रंगाचं कवतिक?"

तात्या म्हनले, "तुला न्हाई कळनार माझे बाय! वॉर्डिनरी लोकानला असं पांढ्रं समदं मेनटेन करता येतं का? न्हाई! कारन हे समदं शाही हाए एकदम."

म्हनलं, खरंच हाए. लोकशाहीतनं मिळालेला हा शाही महाल! ह्ये पांढ्रं घर. त्ये पांढ्रं मेनटेन करायाच हवं. तात्या भाएर इत्की म्हेनत करताहेत. म्यां हप्त्यातनं येकदा काय दोनदा बी बोलवीन पेंटरला न काय!

शाही महाल हा, शाही दिसाया हवा! कारन लोकशाहीतनं आलेले शाही लोक आम्ही, वॉर्डिनरी न्हाई काय! पांढ्रं घर पांढ्रंच दिसाया हवं. दुधावानी!

# ४.



## *सृष्टीचा चमत्कार!*

लय दिसानंतर तात्या निवांत घरला बसलेले. न्हेमीसारखी धावाधाव न्हाई की फोनाफोनी न्हाई. बसून नायलॉन ढोकळा चापत व्हते. बरोबर घोटघोट मसाला चाय न काय! ही आदत लावली त्यानला इन्ड्यातल्या दोस्तानी. दोस्त तर येतात दोन दिसाकरता पन सवै जन्मभरची द्यून जातात. तशी कम्पलेण न्हाई म्हना. इतक्या समद्या सवयी तात्यानला. चाय पिणं काय तितकं वाईट म्हनावं? न तात्यानला इन्ड्याचं कवतिक लय.

"अवं चाय पिनं बरंय कां इत्कं?"

म्यां म्हनली, तर तात्या अजून येक कप यू दे म्हनले चाय! तात्यानचं असलंच कायतरी असतं! येकदा सुरू झाले की थांबनार न्हाईत. ते तारीफ पे तारीफ प्रकर्ण पाह्यलं ना? कितिक गावानच्या मागे हात धून लागलेले.

"काय ती इंड्यातली सवै? असली सवै लावून कशाला घ्यायची म्हनते म्यां?"

"तू कायबी बोल्ते मेल्यू! हे इंड्यातले लोक हाएत त्यानी लय मदत केलेली विलेक्शनीत. त्यानचा चाय तर पिऊ दे. काय काय पोग्राम न्हाई केले न काय काय घोशणा न्हाई दिल्या.. ती आठवते का घोशणा.. अबकी बार ट्रंप सरकार?"

"तर वो? म्यां कशी इसरेन? इतकं काय माझं वय झालं हाए?"

"तुझं? अगं तू माझी तरणीताठी बाई.. खरं सांगू तर लय हाॅट लेडी.."

"या बया!"

म्यां लाजून लाल झाली. नि तात्या म्हनले,"तुला सांगू मेल्यू डार्लिंग, लय लोक बोंबलाया लागलेत आजकाल. कायतर म्हने ग्लोबल वॉर्मिंग का काय तरी!"

"म्हनजे वो?"

"म्हनजे इत्कंच की म्हने समदीकडे टेमपरेचर वाढतंय! म्यां काय म्हनतो ठावं हाए?"

"काय की बया?"

"ह्ये समदं जगासाठी झूठ पण पांढ्र्या घरात मात्र सोळा आणं खरं!"

"का वो?"

"वा! जसं काय ठावंच न्हाई येका हा ॅट लेडीला! तुझ्यावानी हा ॅट बाईल असंल तर वॉर्मिंग व्हनार न्हाई तर काय?"

या बया! म्यां इत्की लाजली की इचारता सोय न्हाई.

"अन तुला सांगतो मेल्यू, हे जगातले सोत्ताला अक्कलवान समजनारे लोक हाएत ना त्ये म्हनतात लय उकडाया लागलं! तू खरं सांग आपलं एअरकंडीशण सुरू असतं तव्हा कधी वाटलं वाढलं टेमपरेचर? म्यां तर कितीकदा सोत्ता टेमपरेचर वाढिवतो का न्हाई रातीला उठून थंडी वाजती म्हनून? उगाच कायबाही बोलतात हे सायनटिस्ट लोक न काय!"

सायन्स अन सायनटिस्ट!

त्यानबद्दल तात्यानला लय म्हनजे लयच राग. तात्या म्हनतात, या चारदोन्शे वर्षात लय घोटाळे झाले पन समद्यात मोठा येकच. सायन्स! हे लोक सोत्ताला लय शाणे समजतात काय. मोठमोठ्या बाता मारतात. शास्त्र नावाची कुणती बी गोश्टच या दुन्येत न्हाई म्हनतात तात्या.

लय वर्षापूर्वी येकदा आम्ही फिरत व्हतो बागेत. म्हनजे लगीन व्हायचं बाकी व्हतं. त्यामुळं असेल, रोमान्स जरा जोमात व्हता. हे म्यां न्हाई, तात्या म्हनतात. म्हनजे बघा, येकवार तात्या काय बोललेले, 'मेल्यू.. मानूस रोम्यांटिक सगळ्यात जास्त कधी असतो सांग तर?'

म्यां म्हनली, 'तो मानूस कोन यावर हाए समदं! तुम्ही असला तर जिंदगीभर!'

'तसं न्हाई गं माझे बाय! लगिनापूर्वी जितका रोम्यांटिकपना असतो तो नंतर ऱ्हात न्हाई! अन्भव हाए माझा!'

असनार! माझ्या त्यांच्याशी लगिनाआधी दोन्दा घ्यून झालाय तात्यानला अन्भव, तर त्यानला ठावंच असनार! आनि त्यानला ठावं न्हाई असं कायबी नाय ह्या दुन्येत. असं त्येच म्हनतात!

तर इशय तो न्हाई. गार्डनात व्हतो आम्ही. पिरिमाच्च्या गोश्टी बोलत. तात्यानी तव्हा सूर्य चंद्र न तारे आनून द्यायची आश्वासनं दिलेली.

'का वं समजा आनला तुम्ही एखादा तारा तोडून, तर त्याचं काय करावं म्यां? ठेवनार कुठं?' म्यां इचारलेलं!

तात्या त्यावर बोललेले, 'तुला न्हाई कळनार माझे बाय! असं बोलन्याची पद्धत हाए!'

खरंतर असं बोलन्याची पद्धत न्हाई तर असं बोलावं लागतं समोरच्याला पटवायला असं म्हनायचं असनार त्यानला. आश्वासन देन्यात तात्या मागे हटत न्हाईत नि ते पाहून मला कळलेलं, तात्या लय मोठे पॉलिटिशियन व्हनार पुढे! झालं बी तसं! मुलाचे पाय पाळण्यात दिसत असतील तर तात्यानचे पाय मला बागेत दिसले न काय!

तर सांगत व्हती बागेबद्दल. लय मोठमोठाली नारळाची झाडं व्हती. त्यात येक नारळ वरनं धापकनी पडलं. म्यां म्हनलं, 'नशिब टकुरं न्हाई फुटलं.'

त्यावर तात्या म्हनलेले, 'ही समदी त्या सायन्सची देन हाए मेल्यू. या सायन्सवाल्याना डोस्क्यावर चढिवलं म्हनून हे असलं व्हत ऱ्हातं.'

'म्हनजे वो?'

'अगं लय वर्षा अगुदर न्यूटन म्हनलेला, सफरचंद जिमिनीवरच पडनार. उलट न्हाई जानार आकाशात..'

'न्यूटन? हा कोन बया?'

'अवं सोत्ताला सायनटिस्ट म्हनवनारा व्हता येक. लोक बी मग त्याला सायनटिस्ट म्हनाया लागले. त्यो म्हने सफरचंदाच्या बागेत येकदा बसलेला. नारळाच्या बागेत बसला न नारळ असा टपकन डोईवर पडला असता तर न्यूटन शिल्लक तरी ऱ्हायला असता? तर, न्यूटन बोलला सफरचंद खालीच पडनार! न ह्ये समदं जिमिनीवर पडाया लागलं. आनि ते नोबेलवाले नाचले असनार लय मोठा शास्त्रज्ञ म्हनून न्यूटनला घ्यून! इकडं कुनाचं डोस्कं फुटंल यापरीस तो सायनटिस्ट म्हत्वाचा. म्हनलं ना, हे सायनटिस्ट सोत्ताला लय ग्रेट समजतात न समदा गोंधळ व्हतो न काय!'

असा तात्यानचा सायन्स न सायनटिस्टांवर लय राग.

अन त्याच्या उलट, तात्यानची आमच्या गावच्या देवावर लय श्रद्धा. गावच्या घाटोबाला नमस्कार केल्याबिगर तात्या येक बी मोठं काम करत

न्हाईत. घाटोबाचं घाटोचाळिशी स्तोत्र म्हनजे दररोज म्हननार म्हनजे म्हननार. घाटोबाचा अंगारा लावून मगच तात्या मोहिमेला निघतात. अगदी ते नवं इमान मिळालं बक्षिस त्याची लिंबूमिर्ची लावून पूजा केलेली तात्यानी. कुनी उगा म्हनलं, शास्त्र न तंत्रशास्त्र यात्नं बनलेलं इमान. त्याची ही पूजा कशी काय करता?

त्यावर तात्या हासलेले.

म्हनले, 'शास्त्र! तंत्रशास्त्र! असलं कायबी नसतं. समदं हाए ती फकस्त येक काळी जादू हाए. त्या जादूमुळंच समदे चमत्कार घडतात. ही सरळसोट पृथ्वी हाए तिच्यावरनं कसं कायबी पडत न्हाई खालती, तसले येकयेक चमत्कार न काय! किंवा तो चंद्र बघ कितीक वर्षं आभाळत तस्साच्या तस्सा बसून हाए हा बी चमत्कारच का न्हाई? काळया जादूत काय बी घडू शकतं!'

समोरच्याचं त्वांड बंद करन्यात तात्यांनचं त्वांड कोन धरनार?

पह्यला येळंस निवडून आले तात्या तर गावदेवीला नवस बोललेली म्यां. कोंबडं कापीन म्हनून. नवस बी फेडलेला म्यां. न्हाई असं न्हाई. पन मागच्या खेपेला विलेक्शन हारले तव्हा तात्या म्हनलेले, 'बाई माझे, या खेपेस बी तू कोंबडं कापायचाच नवस बोललीस तर कसं व्हनार व्हतं? द्येव बी कटाळून जानार न्हवं? त्यो बघत असतो वरनं चुपचाप येकयेकाची नीयत काय! तेच ते कोंबडं द्यू केलंस तर कसली जिंकनार व्हतो म्यां विलेक्शन?'

तात्या म्हनलेले तव्हा म्यां बी इचार केला, तात्यानचं बरोबरच हाए. तात्यानला कुनी म्हनलं, हे काम करून द्या, म्यां येक अमुकतमुक देतो. तात्या

पहिल्यांदा म्हनतील, ठीके. पन दुसरूदा तीच अमुकतमुक कशाला घेतील का न्हाई? नवस बोलताना बी इचार कराया हवा! न्हाईतर आपलं काम ओमफस न उगा देवाला दोश न काय!

तात्या तर म्हनतात नवस म्हनजे वंगण हाए वंगण!

'या बया! वंगण? वंगाळ ठावं हाए पन वंगण?'

'अगं मिशीनीत खडखड खुडखुड नको व्हाया तर त्येल टाकतो ना आपन तसं! नवस बोलला की काम कराया देवाला बी बरं वाटतं!'

तात्या असले न तिकडे काय लोक तो द्येव हाए का न्हाई याचा इचार करत बसलेत! 'असल्या मागास लोकानबद्दल कशाला बोलून येळ वाया घालवायचा मेल्यू. आपल्याला लय कामं हाएत!'

हे खरंय. तात्यानला कामं लय. दुन्येभरची वेवस्था लावायाची तर बिझी व्हनारच तात्या.

श्रद्धेला अंधश्रद्धा म्हननं हीच लय मोठी अंधश्रद्धा म्हनतात तात्या. 'अंधश्रद्धा वगैरे कायबी नसतं. लिंबूमिर्ची लावली म्हनूनच तर इमान कसं इमानेइतबारे उडतया. बाकी ते सायनटिस्टाना कायबी बोलू दे! अगं ह्या दुन्येचे नियम अलग हाएत. या सायनटिस्ट लोकाना लय अकलेची शिंगं फुटली वाटत असंल पन ते तसं न्हाई. मग हे लोक उगा फिजिक्स न केमिस्ट्रीच्या बाता मारत फिरतात!'

तात्या मला म्हनलेले. बोलता बोलता येकदा जीभ बी घसरलेली त्यानची. तशी ती घसरत असती, पन माझ्यासमोर बोलताना ते काळजी घेत असत्यात. पन त्या दिवशी म्हनले, 'ही बायाॅलॉजी वगैरे सब झूठ हाए. खरी ती बायकॉलॉजी जिचा म्यां एक्स्पर्ट हाए!' मग जीभ चावत म्हनले, 'म्यां बायकोलॉजी चा एक्स्पर्ट हाए मेल्यू! हाय का न्हाई?'

असनारच! तीन लगिनं झाली तर व्हनारच ना एक्सपर्ट का काय ते! म्यां मनात म्हनली. उगा चवथ्या नंबरची कुनी बया नको आनाया घरला माझ्या मागनं!

तात्यानचं लय कवतिक वाटतं मला. दुन्येभरात कुनी कुठं कुनी कुठं सायन्सबद्दल बोलत असतात. सायनटिस्ट लोक तर मोकाट सुटले जगभर. काही लोक तर त्यानच्यावर इश्वास बी ठेवाया तयार असतात. तरीबी तात्या आपला हेका सोडत न्हाईत. मोका मिळंल तिथे सांगत असतात, 'सायन्सबियन्स सब झूठ हाए! जगात खरी हाए ती फकस्त काली जादू अन श्रद्धा. बाकी समदं फिजूल हाए!'

म्यां तर तात्या म्हनतात त्यावर डोळे झाकून इश्वास ठेवत असते. तात्या हाएतच तसे हुशार न काय!

म्यां तर म्हनते सृष्टीत लय चमत्कार व्हत असतात. तात्या बी त्यातलाच येक हाएत.. सृष्टीचा चमत्कार!

# ५.



## *रगेल आनि रंगेल*

लय वर्षानंतर तात्यानच्या त्या रंगेलपनाची आठवण आली. म्हनजे झालं काय की तात्या बोलत व्हते. त्यांच्या हापिसात कुनी तरणी बया तिच्याबद्दल. लोक म्हनले असं कसं बोलू शकतात तात्या? म्यां आइकलेलं ते. पन तात्या कुनाबद्दल चांगलं बोलत असतील तरीबी लोकानला प्रॉब्लेम व्हतो. आता तात्या हाएत तसे रंगेल. पन रंगेलपना कुनात नसतो? म्यां म्हनते रंगेलपना नसंल तर तो मानूस मानूसच न्हाई!

खरं सांगू ना तर तसं नसतं तर म्यां तरी हितं असती का? फस्स लेडी म्हनून? इसबावीस वर्षापूर्वी अशी म्यां तमाशाच्या बारीत उभी. पायात घुंगरू बांधून. तवा हा गडी अंगानं उभा न आडवा उभा व्हता समोर. रूपात गावरान

गोडवा घ्यून! तवा तात्या कुनी राजकारनी नव्हते. तरीबी लय भाळलेले म्यां. मग काय? पुढं लगीन करायचं ठरवलं तर म्हने आधी दोनदा लगीन झालंय. माझी माय तर म्हने असं कसं लगीन करते तू? तर म्यांच म्हनली, अन्भवी हाए. येक न्हाई दोन लगिनांचा! मनात म्हनली, गडी रंगेल हाए! तर ह्योच नवरा पाह्यजे!

तात्या रंगेल नसते तर म्यां झाली असती का त्यांची मिसीस? न आज ही फस्स लेडी? तर सांगत व्हते ते हेच, रंगेलपना हवा गडीमानसाला. म्यां तर येक लावनी बी गायलेली पूर्वी. लय दिसात पायात चाळ न्हाई बांधले पन लावनी आठवते अजून..

माझा माझ्यावरीच इश्वास हाए ना
गडी कसा रगेल न रंगेलच हाय ना

लयच राजबिंडा न गडी तगडा हाय ना
खिल्लाऱ्या बयलाची गाडी बडी आलिशान हाय ना
म्यां म्हनतिया म्हनतिया किती नशीबवान म्यां हाय ना
माझा माझ्यावरीच इश्वास हाए ना
गडी कसा रगेल न रंगेलच हाय ना

म्यां व्हती आजवर एकलीच गं बाई ना

आली ज्वानी गं, म्यां तरनी गं, मला घाईच झाली गं हाए ना
आले ते सामोरी, म्यां गोरीमोरी, कशी झाली वं पाह्य ना
माझा माझ्यावरीच इश्वास हाए ना
गडी कसा रगेल न रंगेलच हाय ना

अचानक कुठनं येकायेक आले ते ठावं ना
पाहुन आयाळ घायाळ म्यां, काळजावर घातला घाव ना
आलं ते गाडीवान, अलगच त्यांची शान, लय भाग्यवान म्यां हाय ना
माझा माझ्यावरीच इश्वास हाए ना
गडी कसा रगेल न रंगेलच हाय ना

गडी लयच डौलदार, त्याचा डौल कसा हाए ना
माझा न ताबा सोत्तावर.. बाई तोल माझा गं जाईना
नशीब जोरदार, गडी भेटलं भरदार, अशी जोडी कुठं गावंना
माझा माझ्यावरीच इश्वास हाए ना
गडी कसा रगेल न रंगेलच हाय ना

असली ती लावनी व्हती असली. डौलदार तालेवार बयलांच्या आलिशान गाडीतनं आलेल्या गड्यानं दिल जितलं म्हना की. मग म्यां मागं वळून न्हाई पाह्यलं. त्यानचं दोनदा लगिन झालं वगैरे बात फिजूल हाए पिरमात हे म्यां अन्भवावरनं सांगते. पण हा पॉइण न्हाई.

पॉइण हा, की मानसाला रंगेलपना हवा. म्हनजे मानूस जिताजागता वाटतो. फकस्त तो रंगेलपना एका पॉइणला यून थांबाया हवा. तात्यानचा तो पॉइण आता आला हाए हे समजाया हवं त्यानला. न्हाईतर उगा दुन्येभर इमान घ्यून उडत फिरतील. अन दुन्येभर काय बायांची कमी हाए? अन राजबिंड्या तात्यानमागे त्या बी लागतील तर त्यानची बी चूक म्हनावी कशी? तरीबी तात्यानी आजवर नुसताच बोलन्यात दाखवला हाए रंगेलपना. म्यां धरून हाए त्यानला न काय!

हे सांगते कारन ते त्या हाफिसातल्या बयेबद्दल काहीबाही बोलले म्हनून.

म्यां टोकलं त्यानला.

"असं काय वो कायपन बोलतात? न्हाई म्हनजे बरं दिसतं का ते सर्पंचाला?"

"काय तू मेल्यू? अगं ताकदवानाला समदं शोभून दिसतंय. अन तसं काय वंगाळ न्हाई बोलत म्यां."

"येका बाईबद्दल.."

"अगं, मोठमोठे लोक बोलून गेल्ते, हमेशा खरं बोला. म्यां खरं बोललो तर असा गहजब? अन असं बी म्हनत्यात ना, जे यील मनात ते बोलून टाका. मनात ठिवू नका. तर म्यां बोलून टाकतो न काय! उगा त्या क्लिंटनसारखं तर न्हाई वागत म्यां.."

हे खरं म्हनायचं. अन तात्यातर समदं बिल क्लिंटनच्या नावावर फाडतील येळ आलीतर!

अशा रंगेलपनाबरोबर रगेलपना बी संगतीनंच येत असनार. म्हनजे तात्या रगेल हाएत असले की येकेकाच्या नाकात दम आनून सोडला का न्हाई. सर्पंच बनून साताठ म्हयने न्हाई झाले, येकेक जन जसा त्यानला पाहून चकित व्हतो. त्यानी मग कोनाकोनाला इमानातून हातपाय बांधून त्यानच्या घरला परत कसं धाडलं नि वॉशिंगटनात भाएरून येकेक कायबाही इकायला कसा आडवा हात घातला.. समदं काही वॉशिंगटन परत ग्रेट बनवायासाठीच. लोकानला बी ते पटाया लागलं आता.

तात्या त्या दिवशी लय दिसानंतर घरला व्हते. दुपारी तसे झोपत न्हाईत ते. म्हनतात, वॉशिंगटनाला ग्रेट बनवायचं तर दिनरात म्हेनत हवी. तात्या कसे इस तास कामात न चार तास झोपतात ही बातमीबी यून गेली समद्या चॅनलवर. तात्या हाएतच ग्रेट तसे. पन आज म्हनले, 'मेल्यू, आज जरा पडतो दुपारला.' म्हनलं, 'श्रमिकहो, घ्या इथं इश्रांती न काय!' तात्या झोपलेले. म्यां पाहात व्हती. झोपेत ते निरागस दिसत्यात. एकदा म्हनलेले, "मिल्यू, म्यां स्वप्नंबी बघतो ना ती अशी.. वॉशिंगटन लय मोठं झाल्याची."

चोवीस तास त्योच इचार. मग कशी काय ग्रांपंचायत ग्रेट व्हनार न्हाई?

तर तात्या निजलेले. निरागस दिसनारे तात्या जागे झाले की कुनाकुनाच्या नाकी नौ आनून सोडतील सांगता येत न्हाई.

"काय वो? दुन्येभरात लय गडबड झालीय म्हने. लोक घाबरतात म्हने तुम्हाला.."

"तर गं. मानसानी हातात पावर आली की वापराया हवी. तितका रगेलपना अंगी नसंल तर काय उपेग? आधीच म्यां सुपरम्यान. त्यात आता ही सर्पंचपदाची ताकद. ताकदीची ताकीद वाटायाच हवी का म्हाई? लोकानला सळो की पळो करून न्हाई सोडलं तर म्यां बी म्यां न्हाई!"

मला आठवलं ते लगिन झाल्यानंतरचे दिवस. येका गावात ऱ्हात व्हतो. छोटं गाव ते. येक पिंपळाचा पार, जवळ येक नदी नि मंदिर. लोकानला टायमच टायम कुचाळक्या कराया. तात्या त्या पारावर बसले काही दिस. तिकडं उगा कुनाची खोडी काढ, कुनाला चिडव, कुनाला त्वांड वेंगाडुन दाखव असल्या गोश्टी चालायच्च्या. म्यां म्हनलेली, 'का वं असे तुम्ही? ल्हानपनी बी असेच व्हता का काय?'

'तर गं मेल्यू. अगं अंगाची रग जिराया नगं? ल्हान व्हतो तव्हा झेडपीच्या शाळंत बी असंच व्हायचं का न्हाई? उगा कुना टपली मार, कुनाचं बुक लपवून ठेव. शाळंत चिंचेचं झाड व्हतं. येकदा म्यां त्यावर लपून बसलेला. शाळा सुटली तरी म्यां कुनाला सापडंन तर!'

'ह्याला मस्ती म्हनतात..'

'न्हाई. ही अंगची रग हाए. मला काय वाटतं, द्येवाने स्पेशल बनवून धाडलंय मला हितं. वॉशिंगटनाला ग्रेट बनवाया. मायच्या प्वटी आलो म्यां पन खरं काय ना, गॉडनं धाडलंय इकडं. वॉशिंगटनाला ग्रेट बनवाया. ल्हानपनची रग जिरते थोडीच ना? पन आता ह्ये मस्तीबिस्ती जमत न्हाई. आधी म्यां कुस्ती खेळायचा, बॉक्सिंग न रग्बीबी. कुनाकुनाला थोबडवून रग जिरायची अंगची.'

'तुम्हाला भ्या न्हाई वाटायची?'

'भ्या न म्यां? अगं नंगेसे खुदा भी डरता है म्हनतात. आपन एकदा थोडं बिंधास झालो न म्हनलं का कायबी फरक पडत न्हाई कुनी कायबी बोला, तर मग पुरी दुन्या आपल्या पायाशी येते बघ..'

आता तर काय? सुपरम्यान तात्या येकदा सोडून दोनदा सर्पंच झालेत. दुन्येतला पावरबाज दुसरा कुनी न्हाई. तर रगेलपना वाढनारच न्हाई का?

कालच म्यां म्हनली त्यानला, "काल फ्याशन टीव्ही बघता बघता मध्ये न्यूज चॅनल पाहिला. दुन्येत लयच हलचल हाए! तुमचं नाव गाजतंय. कुनीतरी म्हने तुम्ही रिटायर व्हायचे दिस मोजतायेत. रोज सकाळला सांगतात.. आज येक दिस सरला. अजून इत्के इत्के दिस बाकी!"

"तर गं! म्यां हाएच तसा शक्तिमान. हाएस कुठे? अगं ती ल्हानपनची मस्ती अजून टिकून हाए.

पन आता तशी मस्ती शक्य न्हाई तर काय करनार? न आता तर म्यां सुपरम्यान बी हाए. तव्हा दुन्येभरच्या कुनालाबी सतावू शकतो. कुनी उद्दामपना म्हनतं तर कुनी हडेलहप्पी तर कुनी अजून काहीबाही. म्यां आइकत नसतो कुनाचं बी. दुन्येतल्या सुपरम्याननी हवं तसंच वागाया पाह्यजे. त्यातच जिरते रग अंगची. हाए काय न नाय काय!"

तात्या न त्यानचा रगेल न रंगेलपना. वॉशिंगटनात लय सारे सर्पंच हून गेले. त्यानच्यानंतर त्यानच्या लय गोश्टी लोक अजूनबी बोलतात. पार कुनीतरी केनेडी व्हते, रेगन व्हते त्यापासून ते क्लिंटनपर्यंत.

काही जन तर म्हने लोककथांचा भाग झाले. अशी एकेकाची कीर्ती. म्हनलं, त्या लोकानला तर म्यां पाह्यलं न्हाई. तात्यानचं बी तसंच हाए का न्हाई? अगदी शंबर वर्ष झाली तरी लोक यानच्या श्टोऱ्या सांगनार हे नक्की. इकडे थेट फस्स लेडी बनून ग्रेट तात्यानची आख्यायिका बनताना पाहून ऱ्हायलीय म्यां.

तात्यानच्या रंगेलपनावर नि नंतर रगेलपनाभर भाळलेली म्यां. त्यामुळंच तर ह्ये दिस पाहतेय.

सौभाग्य सौभाग्य म्हनतात ते सौ.मेल्यानियाचं सौभाग्य अजून येगळं काय असनार?

# ६.



## *नो-बेल!*

जे व्हनार व्हतं ते झालंच.

म्हनजे तात्या घरला आले तेच तणतणत. शाळेतनं पोरानं रागारागानं यावं तसं. पाय आपटत तात्या घरला आले न बसून ऱ्हायले. अशा येळेस तात्यानशी बोलनं म्हनजे ज्वालामुखीचा उद्रेक व्हनार. ते चिडाया कारन कायबी असो, राग कशावरबी काढनार. म्हनजे लय वर्षाचा अन्भव हाए माझा, त्यावरनं सांगती म्यां.

नवनवं लगीन झालेलं तव्हा ठावं न्हवतं. असंच ते घरला आले. गेलते तव्हा खुशीत व्हते. आले ते पाय आपटत. मग कायकाय शिव्या हासडाया लागले न वरडाया लागले. असल्या शिव्या तर म्यां तमाशाच्या बारीवरबी

आइकल्या न्हवत्या. म्हनजे तमाशा संपतो न फेटेवाले उगा राडा करत्यात. कोन तमासगिरीणीजवळ जानार यावरनं. मग जी शिवीगाळ व्हती, कानबी इटाळून जातील अशी. तरीबी काय करनार? हातावर प्वाट. आइकायचं न सोडून द्यायचं न काय. तर तात्या त्या दिवशी लय भडकलेले. आज ठावं हाए, अशा येळेस त्यानला एकलं सोडावं. पन तव्हा नवीन व्हती ना. म्हनलं आपलं मानूस का चिडलं ठावं नको?

'काय झालं वो?' म्यां इचारलेलं.

'काय न्हाई..'

'मग त्वांड फुगलंय टोमॅटोवानी ते?'

'तू अजून घाल चायमधी अदरक न मसाला..' तात्या म्यां केलेल्या चहातल्या अदरक मसाला वर चिडलेले?

'का वं? काय प्वटात ग्यासबिस झाला का काय?'

'ग्यास? येकदा उडून जाईल तुझा नवरा तवा समजंल..'

तात्या असे करवादत व्हते. इतकं चिडाया काय झालं कायबी कळंना. चाय म्हनावं तर त्यांना तसलाच चाय लागतो हे मला ठावं झालेलं. त्यात अदरक कमी झालं तर बी चिडनारे तात्या. पुढं त्यानची चाय पिन्याची सवै गेली. मागच्या टायमाला ते इंड्यातनं चायचे खोके आले न तात्या परत चाय प्याया लागले. पन इशय तो न्हाई.

तर तव्हा झालं काय व्हतं? तर पत्ते खेळत व्हते पारावर नि तात्या हारलेले. कुठंबी असंना तात्यानला हारन्याची सवै न्हाई. हारले तरीबी ते हारनं मान्य करनार न्हाईत. नायतर पंच बदलतील किंवा नियमच बदलतील. पन म्यां न हारलो असं व्हतच न्हाई म्हनतील. पन इशय तो बी न्हाई. पत्त्यात हारले न राग माझ्या चायवर? कशाची कशाला टोटल न्हाई!

पन ही तात्यानची सवै मला हळूहळू ठावं झाली. वड्याचं तेल वांग्यावर काढायची सवै त्यानची. मग त्याला काय लाजिक असो का नसो.

तव्हा म्हनलं आज काय झालं? असंल कायतरी.

पुतीनशी न्हाईतर झेलेन्स्कीशी झगडा? का त्या मस्कभौनं काय सांगितलं? त्या चिचुंद्र्या मेलोनीनं कानाडोळा केला का अजून काही घडलं? दुन्याभर संचार असनाऱ्या तात्यानचं बिनसाया कायबी कारन पुरू शकतं तर म्यां काय अंदाज लावनार? जे व्हईल ते पहावं. उगा त्यानचा भडका उडू नये न काय!

लय टाइम तात्या बसून व्हते. मग उठले न अंथरूनात झोपले डोईवर पांघरून घ्यून. हे म्हंजे जरा जास्तच झालं बया. ते घर डोस्क्यावर घेतील न्हाईतर अजून कायबी. पन असं त्वांड लपवून बसतील? नाव नको. लय कायतरी बिनसलं खरं.

म्हनलं ते झोपले तवा बघू कुठं काय बातम्यात कळतं तर. कायतरी मोठं झालं तर ते असेच चिडतील, तर न्यूजमधी असंल ते कदाचित. अर्थात न्यूजवाल्यानचा कायबी भरोसा न्हाई आजकाल. असं आइकून हाए की पैशे दिले की कायबी दाखवतात किंवा पैशे दिले की कायकाय दाखवतबी न्हाईत. म्हनजे कुनाला आडचनीत आननारं काय असेल तर ते नका दाखवू. किंवा कुनाला आडचनीत आनायचं असंल तर कायपन दाखवा! कोन जादा पैशे दील त्यावर न्यूज ठरनार म्हने! असं असंल का न्हाई ठावं. तरीबी बसली बातमी लावून न येकदम समजलं मला, इतके दिस तात्यानी हट्ट केला ज्यासाठी ते नोबेल काय त्यानला मिळालं न्हाई. म्हनजे कुनीतरी मचाडो नावाची बया हाए. काय बी नाव? मचाडो म्हने! अन व्हेनेझुएला तिचं गाव. इतकं छोटंस गाव ज्याचं नाव बी न्हाई म्यां कधी आइकलं. त्या गावची कुनी बया न तिला बक्षिस? तात्याना वगळून? तात्यानवानी सुपरम्यान सोडून या कुठच्या बयेला? नोबेलवाल्यांची अक्कल कुठं जाती कुनास ठावं. तात्या चिडनार न्हाइत तर काय?

तात्या थोड्या वेळानं उठून बसले. त्वांड लटकावून बसले.

"अवं वाईच खाऊन घ्या मीठभाकरी. उपाशी ऱ्हाऊन जग कसं चालवनार?"

"कुनाला काय फरक पडतो? म्यां काय काय न्हाई केलं? पन बक्षिस कुनाला? त्या बाईला?"

म्हनजे माझा अंदाज सही व्हता. नोबेल मिळनार न्हाई हे त्यानला ठावं व्हतं तसं. मागं म्यां त्यानला म्हनलं बी व्हतं, नोबेल नोबेल काय हाए हे? वॉशिंगटनात आपापलं नवं बक्षिस सुरू कराया काय जातं? ते तर मिळंल तुम्हालाच का न्हाई?

"अगं म्या दुन्येभरात फिरत व्हतो भिंगरी लावून पायाला का न्हाई? कुनाकुनाला बाँब दिले कुनाला तोफा न तलवारी दिल्या. कुठं कुठं धनुष्य न बान बी दिले. लोकानला म्हनलं, घ्या हे समदं. म्हनजे फुकाट न्हाई. तसं फुकाट तर कुनाला बी कायबी देत नसतो म्यां तुला ठावं हाए. म्हनलं घ्या न नवी ऑरडर बी द्या. तर लोक म्हनले घेऊ पन थोडं ट्राय तर करू का नको? मग म्हनलं त्यानचं बी बरोबर हाए ना. ते प्याराशूट थोडीच हाए, वरनं उडी मारली न उघडलं न्हाई म्हनून वापस कराया? वापरून न बघता कसं घेनार? मग काय दुन्येत साताठ ठिकानला अशी थोडीथोडी युद्ध पेटली. म्यां म्हनलं समाधान होईस्तोवर वापरून पहा. मगच इश्वास ठेवा. ती जाहिरात व्हती ना साबनाची, पहले इस्तेमाल करे फिर इश्वास करे तसं. म्हनलं, वापरा न म्यां इशारा केला की लढाई स्टाॅप कराची एकदम! अशी दुन्येभरात किती युद्ध म्यां थांबिवली. का? तर दुन्येत शांतता हवी म्हनून. पन कुनाला किंमत हाए माझी?"

तात्या संतापले व्हते.

तात्यानचं काय चुकीचं व्हतं? इतकुश्या गावची कुनी बया न तिला बक्षिस? तिचा जीव केवढा न ती दुन्येत शांतता आननार? काय एकेक आक्रित

न काय. तात्यानी ठरवलं तर येका मिन्टात तिचा आवाज बंद व्हईल न त्या सटवीला बक्षिस देत्यात?

लय दिसापूर्वीची गोश्ट. रस्त्यामधी भांडनतंटा सुरू व्हता. लोक बोंबा मारत व्हते. तंटाबखेडा म्हनलं की तात्या हजर व्हनारच. दोघं भांडताएत तर म्यां म्हनली,'जाव द्या ना!' तात्या म्हनले, 'न्हाई. शांतता हवी तर तिथं म्यांच पाह्यजे.' असं म्हनत जोरात वरडले, थांबा!

ती भांडनारी मानसं क्षनभर इसरलीच कशासाठी तंटा व्हतोय ते. समदे तात्यानकडं बघाया लागले.

मग शांत झाले.

'हे बघ मेल्यू, शांतता हवी तर आपला आवाज लय मोठा हवा भोंग्यावानी! तव्हा कुठं लोक आइकतात."

काय बाई येकयेक! शांतता हवी तर आपन वरडायचं! आपन लय मोठा आवाज करायचा नि इतरांना बोलायचं, शांत ऱ्हा!

"काय ती कोन बया! साधी सर्पंच बी न्हाई न तिला नोबेल? टक्कुरं फिरलंय नोबेलवाल्यानचं. म्यां काय काय न्हाई केलं? तुला आठवतं, पांढ्री कबुतरं उडवलेली आपन ते?"

म्यां कशी इसरेन? शांततेसाठी किती ती उठाठेव. उडनारी पांढ्री कबुतरं पह्यलांदा पकडा, त्यानचे पाय बांधा, न परत त्यानला मोकळं सोडा. हाय का

न्हाई म्हेनत? पन दुन्येत शांतता हवी तर इत्कं तर करायाच हवं! म्यां म्हनलं, आता काय इलाज? अन ते कोन ते नोबेलवाले, ते तात्यानचं थोडीच आइकनार? तात्या म्हनतात तशी ती बया सर्पंच बी नसंल तर तिच्या हातात कसली ताकद असनार? वरडू शकेल ती तात्यानपेक्षा भसाड्या आवाजात?

तात्यानचं बरोबर व्हतं. पन त्या गोश्टीला विलाज न्हाई. मला तात्यानची दया तर आलीच, म्हनलं. काय काय सहन करावं ह्या सुपरम्याननी? कुनीतरी संत बोलून गेल्ते तेच खरं.. जया अंगी मोठेपन तया यातना कठीन. तात्यानचे दिस कठीनच असनार. तरी म्यां बोललेली त्यानला, मस्कभौला मस्का लावून आपली आपली बक्षिस वाटा म्हनून. त्यात दुन्याच काय मंगळ न चंद्रावरबी शांतता व्हावी म्हनून तात्यानला बक्षिस मिळन्यापासून कोन थांबवनार व्हतं? पन न्हाई. बायकोचं आइकतील ते तात्या कसले? म्हनलेले, नोबेलला लय भाव हाय जगभर! म्यां कायबी बोलली न्हवती, पन असा भाव काय आपन मिळवला तर मिळतो बी.

सकाळला तात्या लवकर उठले न तडक हापिसात निघाले. निघताना म्हनले, "तो रामशरन असंल त्याला म्हनावं बोलावलंय. इमरजन्सी हाए म्हनावं."

रामशरन म्हनजे आमचा लाइटवाला! त्याला न इमरजन्सी?

"अवं तो झोपला असेल.."

"ही झोपायची येळ न्हाई. दिनच न्हाई रातबी वैऱ्याची हाए. त्याला उठव न म्हनाव लगेच पोहोच हाफिसात.."

"काय काम काढलंत असं.."

"तुला काय करायचंय? पाय धू म्हनलं तर म्हने तोडा केवढ्याना छेतस? बोलाव म्हनलं की बोलाव. इमानेइतबारे ये म्हनावं. न्हाई आला तर म्हनावं हातपाय बांधून इमानातनं परत धाडून दीन."

रामशरनला फोन केला तर तो घोरत पडला असनार. येकदाचा फोन उचलला. म्हनलं, असशील तसा निघ न जा हापिसात.

तीनचार तासांनी तो परत आला. काही बोलला न्हाई न परत कामाला लागला. काम म्हनजे काय? तर दरवाज्यावरली घंटी काढली. जिकडंजिकडं अशी घंटी दिसंल ती काढत सुटला. म्यां इचारलं तर म्हने, तात्यानचा हुकूम हाए! म्यां काय इचारनार? तात्यानचा येकयेक

चक्रमपना न काय!

संध्याकाळला तात्या आले ते लय मूडमधी व्हते. सकाळला वैतागलेले त्या वैतागाचा मागमूसबी न्हाई. म्हनले, "मेल्यू हून जाव दे दाबेली!"

दाबेली? म्हनजे तात्या लयच खुश दिसतात. लय खुश झाले की तात्या ढोकळा खात्यात न्हाईतर दाबेली. इंड्यातल्या दोस्तानी खिलवली काय येकदा, तात्यानला लय आवडतं खाया ते ह्येच. तात्या लय खुश व्हते. कुनाबी बायकोला काय ना नवरा खुशीत असला तरीबी पटत न्हाई. म्हनजे आपन असताना नवऱ्याच्या खुशीला दुसरं काय कारन असू शकतं? पन इचारायची सोय न्हाई. खानसाम्याला ऑरडर दिली. तो बी तसा तयारीतच असतो म्हना हल्ली. त्याने बनिवली दाबेली.

तात्या दाबेली हानत व्हते. म्यां मौका साधत इचारलं, "काय मग लय खुशीत गाडं? सकाळला गेल्ते त्वांड लटकावून ते?"

"अगं बाय, तुला न्हाई ठावं कायबी. आपल्या प्रॉब्लेमचा इलाज आपल्यालाच करावा लागतो बाई. अन म्यां असताना कसला प्रॉब्लेम न कसलं काय!"

खरंय ते. तात्यानचं तिरपागडं डोस्कं कसं चालेल कुनाला ठावं!

"म्हनजे काय झालं वो?"

"झालं न्हाई माझे बाय! केलं! असं आपसूक कायबी व्हत नसतं.."

"असं कोडं घातल्यागत बोलू नका.. इस्कटून सांगा की जरा.."

"अगं त्या मारिया मचाडोला लाख मिळालं असंल नोबेल तर इकडं आपल्याकडं बी तेच.. नोबेल!"

"म्हनजे?"

"म्हंजे? वाघाचे पंजे न काय! अगं रामशरन आल्ता ना.."

"मग वो?"

"त्यानं हाफिस न घर दोनीबीकडल्या बेल काढून टाकल्या. तिकडे मचाडोबाईला नोबेल न इकडं बी नो-बेल! हाय काय नि नाय काय!"

तात्यानचं डोस्कं असं चाललं म्हनजे! तात्या हाएतच तसे, लय डोकेबाज न काय! मग तात्यानला काय झालं कुनास ठावं, अचानक उभे ऱ्हायले न वरडाया लागले,"मारियाच्या बयलाला ढोल.. नोबेलच्या बयलाला ढोल.."

ल्हान मुलावानी तात्या बोंब ठोकत व्हते न म्यां आइकत व्हती.

रात झाली न म्यां तात्यानला म्हनली,"काय वो, आता कुनी घरला आलं तर ते कसं काय समजायचं म्हना की? दरवाजावर बेल न्हाई.."

"नाव काढू नको बेलचं. आपलं घर न हापिस, समदं नो-बेल.. लोकानला सांग मोबाईलवर फोन कराया.."

"पन म्यां काय म्हनते.. त्याची बी बेल वाजंलच ना वं? न्हाई म्हनजे नो-बेल म्हनता म्हनून.."

"तू म्हनते ते खरं. नो बेल म्हनजे नो बेल.. समदे फोन सायलन वर ठेवा आता पास्नं."

मग एकाएकी जनू त्या कुन्या मारियाबाईशी बोलल्यागत जोरात म्हनले,

"आइक ए मारिया मचाडो.. इकडं बी हाए, नो-बेल! उगा शेखी मिरवाया नको!"

एकूनात काय? तात्यानी आपला हट्ट पुरवून घेतलाच. म्हनलं ना, तात्यानला हराया आवडत न्हाई. तशी येळ आलीच तर त्ये नियम बदलतीत, न्हाईतर अंपायर. न्हाईतर कधी डायरेक खेळच बदलतील! पन हारायाचे मात्र न्हाईत कधी!

तात्यानला इचारलं तर म्हनतील,"म्यां म्हनजेच जीत! मग कुनी कायबी बोलू दे. म्यां जिता हाए तवर माझीच जीत .. हाए काय न नाय काय!"

# ७.



## *अंपायर नंबर वन!*

लय वर्षापूर्वीची गोश्ट हाए. लगिन झालेलं न्हवतं अन आम्ही इकडेतिकडे उगा भटकत असायचो. म्हनजे तसं कामधंदा नसल्यावानी न्हाई. तर हातात हात घालून पिरमाच्या गोश्टी करत. त्या गोश्टी लगिनाआधीच कराव्या लागतात. पिरमाची गानी न्हाई बरं. ती गानी बोलतात ते शिनिमात. खऱ्या आयुश्यात न्हाई. आन म्यां गाऊ शकते, पन तात्या? ते सोत्ताच सोत्ताला गानबेडूक म्हनवतात म्हनजे समजून घ्या! न्हाईतर तात्या सोत्ताला समद्या गोश्टीत नंबर वन समजतात. येकदा असंच भटकत असताना म्हनलेले, 'मेल्यू डार्लिंग, आयॅम नंबर वन!'

म्हनलं, 'कशात वो?'

'कशात काय इचारतेस? समद्या गोश्टीत! जे म्हनशील त्यात म्यांच नंबर वन! म्यां म्हनूनच हाए तुझा लाडका प्रेमी नंबर वन!'

या बया! असं प्रेमी लोकानला पन नंबर द्याया लागले तर? पन तात्या हाएत तसे नंबरीच म्हना. पन इशय तो न्हाई.

तर आम्ही तासनतास भटकायचो. काय काय बोलायचो आता ध्यानात न्हाई. पन नवीन पिरीमात बोलाया इशय लागतो व्हय? नवीन पिरमाचं हे बरं अस्तंय. समदंच नवीन न कोरं करकरीत. मंग उगा भांडन वगैरे न्हाई न एकमेकाला दोश देनं न्हाई. तर असं लय गप्पा मारत भटकत व्हतो तर रस्त्यात झगडा चाललेला. झगडा म्हनजे तंटा न बखेडा. येक गाव तिथं बारा न्हाई बाराशे भानगडी. तव्हा भांडनतंटा व्हायचाच. तसे दोन जनं भांडत व्हते. वचावचा बोलत व्हते न कचाकचा एकमेकांना गुद्दे हानत व्हते. भांडायचे मुद्दे काय व्हते कुनास ठावं पन गुद्दे लय व्हते हे खरं. आमच्या रोमँटिक भेटीत असलं कायतरी समोर यावं? म्यां न्हनलं तिथनं परत फिरावं. पन तात्या? त्यानी माझा हात सोडवला हाताटनं नि झाले पुढं.. थेट त्या दोन भांडनाऱ्यांत घुसले. दोनचार येळंस इकडं तिकडं पाह्यलं. दोघांचं आइकल्यावानी केलं न एकदम वरडले, 'इश्टाप! एकदम सायलंस!'

आता परेंत समदे त्या दोन भांडनाऱ्यांकडं बघनारे लयच दचकले नि इकडंतिकडं पाहाया लागले. दोनही भांडनमूर्ती बी क्षणभर इसरले आपन का भांडन करतो ते. आनि मग काय? तात्या म्हनले, 'भांडन समाप्त!' बघनाऱ्या लोकानला म्हनले, 'जावा आपापल्या कामाला.' तात्यानचा आवेश असला नि

आवाज असला की समदे इसरले भांडन न निघून जायाला लागले. दोघं भांडन करनारे बी माना खाली घालून निघाले. मग तात्या म्हनलेले मला, 'पाहिलं डार्लिंग, म्यां जन्मजात अंपायर हाए! कुनीबी भांडत असो, म्यां भांडन सोडवन्यात एक्सपर्ट! येक नंबरचा अंपायर हाए म्यां. अंपायर म्हनजे अगदी तसंच न्हाई, म्हनजे कोन जीतला की कोन हारला हे न्हाई सांगत म्यां. फकस्त मॅच संपवायचं ह्येच माझं काम! शाळंत व्हतो तव्हा बी म्यां असंच करायचो. पोरं वयतागायची पन माझा आवाज लयच मोठा. कुनी कायबी बोलत न्हाई त्यासमोर. न बोलला तर कुनाला आइकू बी जानार न्हाई!'

तर हे असं तव्हापास्नंच हाए! आमचं लगीन लागलं त्यानंतर बी असंच. पार तिकडं लोनावळ्याला हनीमूनला गेलतो. तिकडं बी असलंच कायतरी! काय तर म्हने भुशी डॅममध्ये दोन कुनी जनं धिंगाणा घालत व्हती. तरून व्हती दोघं. तात्या हनिमून इसरले, वयबिय इसरले नि उतरले मयदानात की! तिकडं धबधबा कोसळतोय न इकडं तात्यानचा त्यावर आयकू जाईलसा आवाज! तात्या वरडतात तो आवाज लय येगळा! म्यां म्हनते बरं झालं तात्यानचा आवाज गान्याला बरोबर न्हाई ते. न्हाईतर आपलं नरडं सांभाळून ठेवताना त्यानला असलं वरडनं पर्वडलं नस्तं का न्हाई? कितीक वर्षात तात्या असली भांडनं तंटे न बखेडे सोडवित आलेत. त्यात कुनीबी बरोबर न्हाई कुनी चूक न्हाई. दोघांनी बी गप्प बसावं न भांडन मिटलं हे तात्यानी जाहीर करावं! म्यां म्हनते कुनी सांगितले हे नस्ते धंदे? लोक हाएत तर ते भांडनारच. तर

तात्या एकदा म्हनलेले बी, 'मेल्यू लोक भांडतात ना ते बघवत न्हाई मला.. मग म्यां पुढं जाऊन दोघानला गप करतो..'

मला ठावं हाए पन! इत्कंच न्हाई. तात्या समदे शांत असतील तर हळूच कलागती लावून द्यू शकतात. मंग तो आवाज वाढला की हाएच, तात्यानची अंपायरगिरी.

आज बी तसंच कायतरी झालं. तात्या घरला आले ते लय उशिरानं. म्यां कटाळून गेलती. फ्याशन टीव्हीबी कितीदा बघत बसनार म्यां? तात्यानचं असंच असतं. काम न काम निस्तं. घरला एकुलती एक बायको वाट पाहातीया याचं भान न्हाई न काय न्हाई. काहीच न्हाई तर कमीतकमी आपल्या प्वटाची तर काळजी हवी की नको मानसाला? वॉशिंगटनाला टनावारी ग्रेट बनवायचं तर म्हेनत हवी हे खरं, पन किती? रात दिस काम. फकस्त काम. पन तात्या काय आइकनाऱ्यातले थोडीच हाएत? माझा डोळा लागलेला वाईच न तात्या घरात शिरले..

"काय मेल्यू डार्लिंग, झोपतेस कशापायी? इकडे तुझा सुपरम्यान नवरा दुनिया गाजवतोय न तू झोपलेली?"

तात्या न सुपरम्यान, अन तात्या न दुन्या गाजवत्यात! यात नवीन काय हाए? हे दर येळेस म्यां झोपायचं न्हाई म्हनलं तर म्यां कधी निजावं बया?

"आज काय बया नवीन पराक्रम?" म्यां इचारलं.

"तू काय इचारतेस? समद्या दुन्येत डंका वाजतोय न तुला पत्ता न्हाई?"

"अवं तसं न्हाई! डंका तर तुम्ही सर्पंच झाले तव्हापास्नं वाजतोय! म्यां तर म्हनतीया, इत्का वाजतोया डंका की भयरी व्हईल लंका! रोज रोज पराक्रम करनार तर कवतिक बी कुनी किती कराव? सवैच हून गेली म्हना ना.."

"अगं, म्यां दुन्येकडे लक्ष देत न्हाई. पन दुन्येकडे लक्ष असतं माझं!"

या बया! लक्ष देत न्हाईत पन लक्ष अस्तं बी! दोनीबी एकाच टायमाला? पन तात्या असलं बोलू शकतात. येकाच येळंला येकाच वाक्यात येगयेगळे नि उल्टे अर्थ असनारं! त्यानला बोलाया आवडतं लय. पन कुनी सवाल इचारलेलं न्हाई आवडत. म्हनतात, 'म्यां जे काय बोलतो, करतो, वागतो तो इचार करून. म्यां हसतो ते इचार करून, वरडतो इचार करून. तव्हा माझ्या इचारावर कुनी परत इचार करावा नि सवाल इचारावा? म्यां न्हाई कुनाला जवाब देनार. बोलन्यापरीस काम करावं.'

तात्यानचं हे असलं. त्यामुळे येकाच येळेस ते कायबी उलट सुलट बोलू शकतात की न्हाई? लय वर्षापूर्वी बोललेले मला, 'मेल्यू डार्लिंग तू मला लय आवडतेस अन आवडत बी न्हाई!' नवीन व्हती तर इचारलं म्यां, 'म्हनजे वो काय?'

'म्हनजे इत्कंच.. म्यां बोलेन ते खरं. त्येच खरं! कुनी इचारायचं न्हाई कां न कसं म्हनून!'

म्हनलं, ऱ्हायलं. तात्या न त्यानचं बोलनं! एकदा तर म्हनले, 'म्यां न धर्म येकच! आता इचारू नकोस का ते!'

म्या तवर जुनी झालेली. वळखाया लागलेली त्यानला तवर. तर तेच म्हनायला लागले, 'धर्म बी तेच शिकवतो का न्हाई? जे सांगितलं ते चुपचाप आइका. प्रश्न इचारू नका!'

म्हनलं हे बरीक खरंय तात्यानचं. त्यानच्या बोलन्यात कधी कधी असं खरं बी बोलून जात्यात ते! प्रश्न इचारायचा न्हाई!

मग ते सोत्ताच म्हनले, "पार तिकडे दुन्येत लोक भांडत व्हते. तो झेलेन्स्की अन तो पुतीन.. सगळीकडं बाँबॉबाँब निस्ती. येक ठोसा मारतो तर दुसरा बुक्का. येकानं इट फेकली तर दुसरा दगूड. म्हनलं काय मान्सं हाएत? तिकडं नेत्यान्याहूचं बी तसंच कायतरी. गाझा नावाचं गाव हाए त्याच्याशी दे दनादन. म्यां किती आवाज आइकनार? कान किटले जनू. आज पुतीन न झेलेन्स्कीला समजावून आलो. दोघं बी आइकतील तर. एकेकाला आइकवलं, सुनावलं. वरडलो कितीदा. आइकतील तर शपथ.."

"त्यो पुतीनभौ हाएच बेरकी.. जरा सांभाळून ऱ्हावा बरं.."

"तर गं. मला सांगते? बारा गावचं पानी प्यालेला हाए म्यां. पन शेवटी एकदाचं आइकलं त्यानी. लढाई समाप्त. दी एंड म्हनतात शिनेमात तसं. त्यात थोडा उशीर झाला. पन आता म्यां बिनघोर झोपू शकतो मेल्यू.."

"ते खरंच. तुम्ही हाएत तर कायबी होऊ शकतं.. त्ये कुनीतरी न्हनतात ना, तात्या हाएत तर मुमकिन हाए! पन झोपनार कशाला? दोन घास खाऊन घ्या म्हनते म्यां. उगा उपाशी प्वटानं कशाला?"

"असं म्हनतेस? दे वाईच झुनका न भाकर तुकडा.."

तात्या मग जेवाया बसले. झुनका न भाकर. ती बी जवारीची. कुनाला वाटेल त्यात भागंल त्यानचं. तर न्हाई. बरोबर खायला लसणीचं तिखट न कोथिंबीरीचा खुडा न कांदा बी, बुक्कीनं फोडून, संगतीनं उडदाचा पापड, तो बी शेगडीवर भाजलेला. वाईच खानं म्हने, ते असं साग्रसंगीत. खाऊन ढेकर देत तात्या निजाया निघून गेले. म्यां बी नंतर निजली.

नि रातीला काय व्हावं? येकायेकी जागी झाली ते कशानं? तात्या झोपेत व्हते. ते म्याच नंतर करतात तसे माझा हात पकडून वर करत व्हते.. न झोपेत पुटपुटत व्हते.. म्यां हाए अंपायर नंबर वन! ते झोपेत व्हते, तर म्यां बी हात सोडवून घेतला न चानस घेत त्यानच्यासारखंच वरडली, "निजा गिपचिप.."

दुसऱ्या दिवशी सकाळला म्यां टीव्हीवर च्यानल बदलत बसलेली. ब्रेकिंग न्यूज म्हनून बातमी आइकली, तात्यानची पाठ वळाली न पुतीन झेलेन्स्कीचं परत वाजलं म्हने. ते व्हनारच व्हतं. तो पुतीनभौ हाएच लय खट. म्हनलं आता तात्यानला लय वाईट वाटेल..

तात्या चाय पीत बसलेले. म्या म्हनली, "आता वं? कुत्र्याच्या शेपटावानी हे वाकडेच.."

तात्या म्हनले, "फिकर न्हाई करू डार्लिंग. शाळंत व्हतो तव्हा काय व्हायचं आठवतं का न्हाई? हेडगुर्जी आले की समदी पोरं शांत बसायची न गेले की परत दंगा सुरू! तसं हाए की न्हाई हे?"

"म्हनजे?"

"अगं, साधी गोश्ट हाए! ती हाएत दंगा करनारी पोरं, न म्यां? हेड गुर्जी! म्हनजे, म्यांच अंपायर. समज की येक म्याच संपली. आता नवीन म्याच सुरू झाली.. म्यां हाए अंपायर न ते हाएत.. हून जाव देत! ह्या म्याचचा बी म्यां हाएच ना अंपायर! दुन्येतला अंपायर नंबर वन!"

तिकडं नेत्यानाहूभौ बी म्याच म्याच खेळतो न इकडे पुतीनभौ बी. अन तात्या बसलेत डोईवर हॅट लावून, म्हनत ह्येच, "येळ आली की म्यांच हाए ना अंपायर! दुन्येभरातला येकटा नंबर वन अंपायर. समद्या म्याचा संपवनारच म्यां. जातात कुठं?"

# ८.



## *तात्या नि सायन्स*

तात्या न त्यानच्या आरडरी! म्यां तर म्हनते पुरी जिंदगी त्यानच्या आरडरी पाळन्यात जानार. तसं काय वाईट हाए त्यात? त्यानच्याप्रमाने सर्वज्ञानी अन ताकदवान दुसरा कुनी हाए का दुन्येत? त्यानची आरडर म्हनजे सवाल इचारायचा न्हाई! फकस्त ते म्हनतील ते करायचं न काय!

तर, त्यानला जायचं कुठं दुसऱ्या गावात न आरडर मला,"मेल्यू, माझी ब्याग प्याक कर. अन ती पिवळी ब्याग फकस्त! अन पिवळे रूमाल दे.."

तात्यानचं हे लय. पिवळा रंग त्यानला आवडतो असं न्हाई. पन पिवळा म्हने त्यानचा लकी रंग हाए! म्यां हळूच पाहून घेतलेलं, कुठे त्या मिलोनीला तर

भेटाया नाही चालले ना? तर न्हाई. हा सुपरम्यान दुन्येत कुठेकुठे जात असतो. या खेपेस तरी त्या सटवीला भेटाया न्हाई.

मला आठवतंय, लगिनाआधीची गोश्ट. येकदा भेटायचं व्हतं. म्यां बी ना, त्या दिवशी बारी बंद ठेवली. तमाशा काय आजचा उद्या व्हईल, तात्याना भेटायची ओढ लय मोठी. तात्या लय लांबनं येनार. संध्याकाळला सात वाजेला. म्यां वाट पाहातीय. थकून गेली वाट पाहन्यात. कुठं इसरले की काय येन्याचं. आले तवर लय उशीर झालेला. कारन काय? तर म्हने,

'अगं डार्लिंग, रागावू नकोस. गाडीनं येत व्हतो तर मांजर आडवी गेली! ती बी काळी. अपशकुन झाला.'

'मग वो?'

'अगं चालनारा मानूस सात पाऊलं मागं जातो. म्यां गाडी सात किलोमीटर मागं नेली. ती बी उलटी! रस्त्यात ट्र्याफिकमधी असं करनं सोपं हाए का? त्यात लेट व्हनार का नाय? पन असं केलं म्हनून आलो का न्हाय सुखरूप?'

तर त्या पिवळ्या ब्यागेबद्दल. लकी रंग न लकी नंबर असली त्यानची श्रद्धा हाए. श्रद्धाच. अंधश्रद्धा न्हाई. तात्या तर म्हनतात, अंधश्रद्धा नावाची कोनती चीजच या दुन्येत न्हाई. श्रद्धेला अंधश्रद्धा म्हननं हीच मोठी अंधश्रद्धा हाए! असंल बाई! म्यां अडानी बाई. मला काय समजतं नि उमगतं?

पन तात्यानचं हे असं हाए. मागं एकदा, म्हनजे इलॉन मस्कभौ न त्यानची दोस्ती व्हती तव्हा, इलॉन म्हनलेला, सायन्स नि तात्या म्हनजे इरूद्धार्थी शब्द! तर तात्या म्हनलेले, 'सायन्स हा शब्द म्हनजेच अंधश्रद्धा हाए! दोनचारशे वर्षापास्न सायन्स नावाची अंधश्रद्धा मागं लागलीया हात धुवून. जमंल तितकं हे सायन्सचं खूळ लोकानच्या डोस्क्यातून काढून टाकाया हवं. वॉशिंगटनाला ग्रेट बनवायचं तर हे करायाच हवं. पन म्यां फकस्त चार वर्ष सर्पंच. काय काय करनार एकटा?'

तर सांगत व्हते ते, सायन्स न तात्या म्हनजे इळा न भोपळा! इळ्याला पाहून भोपळ्यानं 'पळा रे पळा' म्हनावं तसं कायतरी व्हतं तात्यानला सायन्स म्हनलं की. तात्यानचं बरोबर हाए. न्हाई म्हनजे तात्या कधीबी चुकत न्हाईत हे ही बरोबर हाए! त्यामुळे म्यां तर तात्यानवर डोळे झाकून इश्वास ठेवते. न तात्यानला तेच आवडतं लय! म्हनतात, 'ह्येच मला नाय आवडत सायन्सबद्दल.'

'म्हनजे वो?'

'अगं, ते लोक म्हनतात सायन्स म्हनजे प्रश्न इचारा, प्रयोग करा न मग इश्वास ठेवा. च्या मारी! इत्की उठाठेव? कशासाठी? तर म्हने सायन्स असं सांगतं म्हनून! म्यां म्हनतो म्हनू दे की. आइकनं न आइकनं आपल्या हाती हाए का न्हाई? सायन्स सायन्स म्हनून डोईवर घ्यून नाचता पन थोडी अक्कल असंल तर समजेल, याला न त्याला प्रश्न इचारन्यात जिंदगी वाया घालवायची का तयार उत्तरं वापरत सोपी हे ठरवाया नको? उगा डोक्याचा भुगा न काय!'

'म्हनजे वो? तो आइनस्टाइन का कोन हून गेला, न्यूटम नावाचा कुनी हून गेला.. ते सारे येडे व्हते?'

'येडे? शंभर टक्के! नुस्ते न्हवे, ठार येडे. आनि न्यूटम न्हाई न्यूटन नाव व्हतं त्या आयटमचं. त्या येड्यानं तर सफरचंद पडताना पाहून मुकाट खावं ना? तर न्हाई! मांडत बसला कसला तरी नियम. मला न्हाई पटत. कारन म्यांच माझा नियम! असले न्यूटन न आइनस्टाइनचे नियम पाळाया म्यां काय गुलाम हाए त्यानचा? आनि वर तोरा यानचा असा की जगाचे नियम समजावतो म्हने!'

सायन्स म्हनलं की तात्यानचा पारा असा चढायाच हवा. म्यां म्हनते ज्या सायन्सनी बंदूक दिली नि बाँब दिले त्यानला तरी मानाल की न्हाई? पन तात्यानचं लाजिक येगळं.

'तू त्या बद्दल बोलू नको काय बी. तुला काय वाटलं, जव्हा हे समदं नव्हतं तव्हा मानसं भांडत न्हवती? लढाया न युद्धं व्हत न्हवती? लोकं काय सायन्सची वाट न्हाई पाहात बसले. तव्हा बी एकमेकांच्या उरावर बसायचेच ते न डोकी फोडायचेच ते. त्यानला काय ठावं व्हतं तो न्यूटन काय बोलतो ते?'

तात्या म्हनतात ते खरंच. लोक काय काय अभ्यास करतात म्हने. म्हनजे बघा, मानसाचं शरीर कसं चालतं? तात्या म्हनतात आपोआप चालतं. कुनी सांगाया नको काळजाला धडधडाया नि प्वटाला खाल्लेलं पचवाया. समदं आपसूक व्हतं. तिकडं काय बुकं वाचून घडतं, न न्हाई वाचलं तर बिघडतं असं

हाए काही? उगा कायतरी म्हने शास्त्र न विज्ञान. त्यावाचून न अडलंय न अडेल कुनाचं बी.'

हे खरं हाए का न्हाई? सायन्स न बियन्स ठावं न्हवतं तवा बी दुन्या चालायची न आता बी चालतेच. कायतरी सायन्स सायन्स म्हनून बोंबा ठोकायच्या न जे ठोकनार न्हाईत त्यानला म्हनायचं, तुम्ही लोक लहान. तात्या बरं आइकून घेतील?

म्यां तर म्हनते तात्या हेच मोठं कालेज हाए शिक्षनाचं. त्यानला समदं ठावं हाए दुन्याभरचं. तो कोरोणा आलता तव्हा पाह्यलं का न्हाई? दुन्येभरात म्हने कोरोणा आलता चायनामधून. तात्या म्हनलेले, 'कोरोणाबिरोणा असलं कायबी नस्तं. लोकं मरतात कारन की त्यानचं आयुश्य संपलेलं असतं. मग मरनारच कोनी बी. म्यां मेलो का?'

म्या त्यानच्या त्वंडावर हात ठिवून बोललेली, 'असं बोलू नका धनी. वॉशिंगटनाला तुमची गरज हाए..'

'अगं कायबी होत न्हाई मला. कोरोणाचा बापभी माझं काय बिघडवनार हाए?'

मग ती विलेक्शन हारलेले तात्या. चिक्कीखाऊ बिडेनभौनं फशिवलं. तव्हा बी तात्यानी या पांढ्र्या घरातून आम्हाला हाकलवायला आलेल्या लोकानला कोरोणाची भ्या दाखवून पळवून लावलेलं. म्यां डायरीत लिव्हलेलं तसं तव्हा. कोरोणाच काय कुनालाबी तात्यानचं भ्या वाटंलच का न्हाई?

पन कोरोणाचीच न्हाई तर बाकी लशींवरनं बी तात्या चिडतात लय. लस टोचनं ही समद्यात मोठी अंधश्रद्धा. लस टोचून कायबी व्हत न्हाई.

'मग ते दुन्येभरचे लोक? ते लावतात की सुया?' म्यां इचारलेलं.

'समदी दुन्या असंल येडी म्हनून म्यां न्हाई. म्यां सर्पंच व्हईन परत येकदा न लोकानला पटवून दीन. हे असलं सायन्सचं थोतांड बरं न्हाई. पन लोकानला नादी लावनारे लय पावरबाज हाएत. म्यां बननार सुपरपावरबाज नि दाखवीन एकेकाला त्यानची जागा न काय?' तात्या परत आले न करताहेत यासाठी काम. वॉशिंगटनाला ग्रेट बनवायचं तर हे करायाच पाह्यजे.

लय वर्षापूर्वीची गोश्ट कुनी तरी येकदा म्हनलं, प्रुथ्वी गरम व्हतीय म्हने! हे आइकून तात्याच गरम झाले लय. लाखो वर्षाचं प्रुथ्वीचं वय हाए. कधी गरम कधी थंड व्हनार का न्हाई? मानूस बी व्हत ऱ्हातो थंड नि गरम तर प्रुथ्वीनं का होऊ नये? एकदा तर बोलले, 'लय म्हनजे लय हासाया येतं बघ. म्हने प्रुथ्वी तापतीया. इकडे म्यां त्या एरकंडिशनात कुडकुडत व्हतो नि तो कुनी रेम्या डोक्या म्हनतो, प्रुथ्वी तापत चाललीय? कुनी म्हनतात हवा बदलत चाललीय. बदलनार न्हाई? एकाच जागी पहिल्यावानीच ऱ्हाईल ती? मोठमोठे डोंगर घासले जातात नि त्यानच्या टेकड्या बनतात तर प्रुथ्वीनं बदलू नये? सायन्स लय बाता मारतं, प्रुथ्वी तापतीय म्हनून. या लोकानला डाग द्याया हवा गरम न काय!'

सायन्सवाले कुनी काय बोलाया लागले की तात्यानच्या तळपायाची आग मस्तकात जाते. बिचारे तात्या. कुठं कुठं पुरे पडनार? कामं करनार की ह्या सायन्सवाल्यांची थोबाडं बंद करनार? म्यां एकदा बोललेली तात्याना, 'का वो? सायन्स न तुमचा छत्तीसचा आकडा. मला ठावं हाए. पन इतका का?'

'तुझं म्हननं खरं हाए. पन त्याला कारन काय हाए ना, म्यां वॉर्डिनरी न्हाई म्हनून!'

'म्हनजे वो?'

'दुन्येत दोन प्रकारचे लोक असतात. येक वॉर्डिनरी टाइपचे. न दुसरे आपल्यावानी, जे वॉर्डिनरी लोकानवर राज्य करतात. वॉर्डिनरी तसे का ऱ्हातात? कारन येकच, ते तसे असतात म्हनून. न म्यां सर्पंच का? कारन म्यां वॉर्डिनरी न्हाई म्हनून! दुन्येत वॉर्डिनरी लोक लय. आपल्यावानी लय थोडे. पन राज्य करायचं तर तर म्यां म्हनतो, आपलं आइकायला हवं का न्हाई त्यानी. पन सायन्स काय शिकवतं? म्हनतं सवाल करा! प्रश्न इचारा. आता वॉर्डिनरी लोक इचाराया लागले तर आपल्यासारख्यानी काय कराव? त्यानच्याशी सवालजवाब करावे? म्यां म्हनतो करू बी एखाद येळेस पन ती त्यानची लेव्हल हाए का? आपल्यासारखे लोक कुठं नि ते कुठं. सायन्समुळं यानला डोस्क्यात प्रश्न पडाया लागले तर वॉशिंगटनाचं काय व्हईल कधी इचार केला हाएस? म्यां म्हनतो, हा सुपरम्यान बोलतो ते लोकानी मानाया हवं. उगा सवालांचे कीडे का वळवळाया लागावेत? सायन्स शिकवतं हे सारं म्हनून सायन्सचा मला तिटकारा

हाए.. आनि म्यां म्हनतो तेच खरं असताना ह्या सायन्स न बियन्सचं कशाला उगाच कवतिक?'

हे समदं आइकून मला तात्यानचंच कवतिक वाटाया लागलं. ग्रेट मानसाकडूनच ग्रेट काम व्हनार!

मनात म्हनलं, तात्यानच्या एका इचारामागे किती सारे इचार दडलेले असतात! सदा वॉशिंगटनाला ग्रेट बनवायचे इचार न काय! तरीबी म्यां म्हनते एखाद्या मानसानं किती म्हेनत करावी? दिस नि रात एक करावे नि लोक म्हननार का बुवा असं? तर त्यानला वाटनार न्हाई का, शेळी जाती जिवानिशी नि खानारा म्हनतो वातड? सायन्स थोतांडच न्हाई तर ही येक लय टाकाऊ गोश्ट हाए हे पटलंय मला. सवालच न्हाई. दुन्या उगाच सायन्सच्या मागं धावतीया, पन एक न एक दिवस तात्यानचंच बरोबर ठरनार.. ठावंच हाए मला.

प्रश्नच न्हाई! तात्याबी खूश व्हतील. म्यां प्रश्नच न्हाई म्हनलं म्हनून.

त्यानला तरी दुसरं काय हवंय?

आनि गंमत म्हनजे मला वाटतं ना, कितीबी शास्त्राला नावं ठेवा, तात्यानच्या राजकारनामागं हाए ते बी तात्यांचं एक स्वत:चं शास्त्रच म्हनायला हवं!

# ९.



## *मागा! मागा!*

लय म्हनजे लय म्यां चिडलेली त्या दिवशी. इत्का मोठ्ठा सुपरम्यान. म्हनजे तसा न्हाई, आतली चड्डी भाएर घालनारा न हवेत उडनारा. तो गोश्टीतला खोटा व्हता तर हा खरा हाए. हा सोत्ता उडतो न दुश्मनाला उडवतो. याच्यामंदी एकेक सवालाला उडवून लावन्याची हिम्मत हाए. म्यां तर म्हनते नुसती आतली चड्डी भाएर घालून कुनी सुपरम्यान व्हतं का?

तर इशय काय की तात्या आजकाल दररोज भाशणं ठोकतात. न्हाई भाशणं ठोकन्याचं काय न्हाई. नेता म्हनला म्हनजे भाशण आलंच का न्हाई. भाशणाविन नेता म्हनजे दातावाचून वाघ न्हाईतर सोंडंवाचून हत्ती का न्हाई? एकदा तात्याच म्हनलेले, 'मेल्यू, भाशण भाशण न भाशण! बोलन्याबिगर

करन्यासारखं काय असतं पुढाऱ्याकडं? बोलावं न बोलत ऱ्हावं. लोकानला आइकाया ग्वाड वाटावं असं बोलावं. आता एकाचं ग्वाड दुसऱ्याला कडू वाटाया लागलं तर विलाज न्हाई! म्हनतात ना, एकाचं औशद, दुसऱ्यासाठी जहर होऊ शकतं! तसंच हाए हे. भाशणं ठोकावी, एकाला खूश करावं तर दुसरा नाराज व्हनार!'

'मग वो? कुनी नाराज झाला तर? तो विलेक्शन मंदी यील का बरोबर?'

'मेल्यू, तुला समजायचं न्हाई माझे बाय. अगं तो नाराजीवाला मानूस अन राजी असलेला मानूस.. दोघं बी भांडाया लागतील आपसात. मग आपला मानूस दुसऱ्याचं डोकं फोडेल. तुला ठावं हाए ना ती बोक्यांची गोश्ट?'

'या बया! या वयात का म्यां गोश्ट आइकत बसनार?'

'तसं न्हाई गं. लोन्याचा गोळा न दोन बोक्याची गोश्ट ती. दोघं भांडन करतात तर फायदा कुनाचा व्हतो? तिसऱ्याचा! तसं हाए! लोकानचं भांडन व्हईल न विलेक्शनीत फायदा माझा! हाय काय अन नाय काय! तर भाशणं अशी करायची की लोकं एकमेकांत भांडाया लागावीत..'

हे ठीकच हाए. राजकारन्याला भाशणं करायाच लागतात. बोलत ऱ्हावं. मनाला यील ते. त्यात तुम्ही दुन्येतलं सर्वात मोठ्या ग्रांपंचायतीचं सर्पंच असनार तर कोन कशाला तुम्हाला अडवनार? हवं तितकं, हवं तिथं, हवं ते बोलावं. कुनी इचारत न्हाई की काय बी न्हाई. येकदा म्हनलं ना, की म्यां समद्यात ग्रेट न म्यां म्हनतो ते अन त्येच खरं की समदे प्रश्न सुटतात. मग कुनी कायबी इचारायची

हिम्मत करत न्हाईत. अन केलीच तर? सुपरम्यानच्या हातात काय न्हाई? कुनाला कसं गप्प करावं, कुनाची कशी गचांडी वळावी इत्कं बी त्याला ठावं नसनार?

तर इशय हाए भाशणं ठोकन्याचा. झालंय काय की तात्या कुठं कुठं जाऊन आजकाल येकच धोशा लावाया लागलेत. जिकडं तिकडं म्हनतात येकच.. मागा! मागा!

येक झालं, दोनदा झालं, दहा येळंस बी तेच! मागा! मागा! म्यां मग चिडनार न्हाई तर काय? येवढ्या मोठ्या सुपरम्याननं विलेक्शनीत व्होट मागनं ठीक हाए, त्याला विलाज न्हाई. येकदा लोकशाई म्हनलं की ही व्होटाची भीक मागाया लागतेच. काय करनार? ती बी हर चार वर्ष झाली की. विलाजच न्हाई न काय? या येळेस विलेक्शनच्या टायमाला न्हाई पाह्यलं का? तात्यांची जीभ तरवारीवानी तळपत व्हती तव्हा. त्या तरवारीनं मुंडी उडत असेल न मानसं भुंडी व्हत असतील. इकडे तात्या निसत्या बोलन्यानं कुनाकुनाची टोपी उडवतात. तव्हा समदं वेवस्थेशीर हून ऱ्हायलंय. न्हाई म्हनजे विलेक्शनची भाशणं अलग नि येकदा सर्पंच झालं की अलग. विलेक्शनच्या टायमाला कसं ग्वाड ग्वाड बोलावं लागतं. विलेक्शन नंतर द्वाड द्वाड वागलं तरीबी चालतंय. म्यां तर म्हनते विलेक्शन म्हनजे समदा बोलन्याचा खेळ हाए न काय. म्यां न्हाई का तव्हा मस्कभौच्या बिनवाहकाच्या गाडी बसून वॉशिंगटनभर हिंडलेली, तात्या किती ग्रेट हाएत सांगत. तव्हा तात्यानचं एकच टुमणं, म्हने वॉशिंगटनाला परत ग्रेट बनवायचं! लोक बी कसे पहा ना, बिडेभौच्या आधी चार वरीस तात्याच तर

व्हते सर्पंच, तव्हा काय केलंत वगैरे इचारत बसत न्हाईत. झालं गेलं गंगेला मिळालं म्हनतात न इसरून जातात झालं. म्यां तव्हा इचारलेलं तात्याना, 'काय वो? समजा कुनी इचारलं की मागच्या येळी सर्पंच व्हतात तव्हा ग्रेट बनवलं न्हाई का वॉशिंगटन?'

त्यावर ते काय म्हनले?

'येडी का खुळी तू? अगं लोकांनला काय ध्यानात ऱ्हात नसतं. नि आपन बोलावं असं की कुनी इचार करू नये. जो जितका लोकानला हे कराया लावनार, तोच विलेक्शनीत जीतून येनार! तिकडं दुसरं काय बी लॉजिक काम न्हाई करत माझे बाय. तव्हा तू गाडीतनं फिर नि वॉशिंगटनभर सांगत सुट, या तात्याला वॉशिंगटनाला परत ग्रेट बनवायचं हाए..'

म्यां काय त्यांच्या आज्ञेभाएर हाए?

तरीबी इशय तो न्हाई. एकदा सर्पंच झाले नि आता हे काय जिकडंतिकडं मागा, मागा? म्यां चिडलीच एकदा.

"काय वो हे आइकते म्यां? झालेत ना दुसरूंदा सर्पंच. हाय की इत्कं मोठालं घर, दोनचार इमानं हाएत, दुन्येभर वट हाए.."

"सोन्यासारखी बायकू हाए.."

"जावा तिकडं. कायबी तुमचं.. पन म्यां म्हनते  अजून काय मागाया लागलेत रोज उठून? बरं दिसतं का ते?"

तात्या यावर काय बोलनार? नुस्तेच गप बसून ऱ्हायले.

म्यां अगदीच भुणभुण कराया लागली तर म्हनले, "तुला काय बी समजत न्हाई.."

म्यां म्हनलं यात नवीन काय? तात्यानच्या डोस्क्यात काय चालतं हे कोनाला समजलंय? मला तर सौंशय येत ऱ्हातो, त्यानला सोत्तालाबी समजत असंल का काय?

"ते ठीक हाए पन इकडंतिकडं मागत फिरताय उगा.."

तात्या यावर हसाया लागले. म्हनले, "अशी कशी गं माझी बाय तू?"

यावर म्यां काय समजावं. जाव दे म्हनलं, तात्या करत्यात ना, काय तरी समजून उमजूनच असनार न काय. ते कायबी न समजता करत न्हाईत.

म्यां चुप्प झाली तर तेच म्हनले, "तुला काय वाटलं म्यां मागत फिरतोय? लोकानला सांगतोय मागा मागा माझ्याकरता? तर न्हाई.. म्हनतो काय बी मागा.."

"म्हनजे? अजून काय मागनार लोक?"

"तसं न्हाई मेल्यू. म्यां आपली गंमत करत व्हतो.."

"तुम्ही न तुमची गम्मत. तुम्ही न तुमची भाशणं. अन तुमचे ते राजकारन. मला तर बाई काय बी कळंना झालंय.."

"अगं त्याला काय झालंय? समदं कळायाच हवं असं नसतं माझे बाय!"

तात्या बोलले पन माझ्या डोस्क्यात कायबी प्रकाश पडला न्हाई. म्हनलं असंल कायतरी न काय!

तात्यानची भाशणं सुरूच व्हती. जिथं जातीत तिथं माईकचं बोंडूक दिसलं की सुरू!

मला आठवलं, सुरवातीचे दिवस व्हते. म्हनजे तात्याच तव्हा विलेक्शन लढनं वगैरे बी ठरलं न्हवतं. आम्ही असे चौपाटीवर फिरत व्हतो. म्हनजे म्यां म्हनलेली तात्यानला, "काय वो? वॉशिंगटनात समदं काय हाए पन म्यां चौपाटीवर कधी बी गेली न्हाई!"

"असं म्हनतेस? चल घ्यून जातो न काय!"

मग चौपाटीवर फिरायला गेलतो. तिकडं वॉशिंगटन टाइम्स पेपराच्या रंगीत कागदावर भेळ खात व्हतो. जवळ आइस्क्रीमवाला व्हता.

म्यां म्हनलं, "खानार का?"

म्यां दोन आइस्क्रीमं घेतली. कोन आइस्क्रीम. येक म्यां घेतलं. दुसरं तात्यानी घेतलं नि काय करावं? तो कोन समोर धरला नि लागले भाशण दिल्याप्रमाने बोलाया, "मेल्यू, आई रक्ताची शपथ.. तू माझी न म्यां तुझा. अन तुझाच.. हा माझा शब्द हाए.."

मला वाटलं हे असलं भाशण नि इकडं चौपाटीवर?

तर तात्याच म्हनले, "हा कोन आईस्क्रीम किनाही वाटतो माईकच्या बोंडकावानी. समोर दिसला की बोलाया त्वांड शिवशिवतं बघ! अन कधी बी बोलायचं ते आश्वासन देन्यासाठीच!"

तर हे असं हाए. आता बी माईक दिसला की भाशण सुरू नि भाशण सुरू झालं की मागनं 'मागा! मागा!' सुरू. मला कायबी टोटल लागंना. इलॉनबी येत न्हाई, व्हान्सला इचारू तर तात्यानला आवडेल न आवडेल कुनास ठावं..

मग एक दिस तात्यांचा टीव्हीवर कार्येक्रम सुरू व्हता. म्हनजे म्यां तो हमेश बघते असं न्हाई पन त्या दिवशी दिसला न काय. पाठनं 'मागा! मागा!' सुरू व्हतं. इतक्यात तो टीव्हीवरला बातमीवाला गर्दीतल्या कुनाकुनाशी बोलाया लागला एकेकाच्या त्वंडापुढे माईक धरून. त्यात एक सवाल आला.. की बुवा हे 'मागा मागा' हाए त्याबद्दल तुला काय वाटतं?

म्यां कान टवकारले. म्हनलं बघू काय समजतं उमगतं का?

तर तो मानूस म्हनला, 'तात्या म्हनजे वॉशिंगटनाचं भविश्य हाएत. मागा म्हनजे मेक अमेरिका ग्रेट अगेन ही तात्यानची घोशणा म्हनजे तात्यानचा मास्टरस्ट्रोक हाए.." पुढं बी बोलला कायतरी!

मास्टरस्ट्रोक! तात्या मारतात तो हर एक फटका मास्टरस्ट्रोकच असतो. म्हनजे तात्याच येकदा तसं म्हनलेले ते आठवलं.

काही म्हयन्यांच्या आधीची गोश्ट. बातम्यांचा कर्मणूकीचा कार्येक्रम पाहात येकदा बसलेलो आम्ही. तात्यांनी नुकताच नवा कोणता तरी निर्णय घोशित केलेला. टीव्हीवर ते बातमीवीर तावातावाने बोंबाबोंब करत बसलेले.

तीन चार लोक व्हते. समदे एकच म्हनत व्हते, हा निर्णय म्हनजे कसा मास्टरस्ट्रोक हाए. बाजूला तात्या गालातल्या गालात हासत बसलेले.

'तुला सांगू मेल्यू, स्ट्रोक मारावा तो मास्टर स्ट्रोकच! म्यां ल्हान व्हतो तव्हा ब्याटबॉल टीमचा क्याप्टन व्हतो.'

'क्याप्टन?'

'मग गं? कुठंबी गेलो तरी म्यां क्याप्टनच. मंग म्यां ब्याटिंग करायचो तर समदे म्हनायचे.. वा! वा! मास्टरस्ट्रोक! म्हनायचेच! अगं, असं म्हनतील तेच टीममधी घ्यायचो म्यां. त्यात ब्याट माझी न बॉल बी माझा. झकत यायचे सारे लायनीवर न काय! तव्हापास्नं मारतोय म्यां मास्टरस्ट्रोक वरून मास्टरस्ट्रोक न काय!'

म्हनजे 'मागा! मागा!' परत परत बोलत ऱ्हानं हा बी मास्टरस्ट्रोक अजून एक!

म्यां कपाळावर हात मारून घेतला! बाई बाई! इतके दिस प्रचारात घसा फोडला ते इसरली का इतक्यात? न्हाई, माझी चूक न्हाई खरंतर. हे पुढारी लोक विलेक्शनच्या टायमाला बोलतात ते नंतर त्यानला आठवनीत ऱ्हातं थोडीच. अमेरीकेला ग्रेट बनवनार व्हते तात्या, मला वाटलं बनवून झालं असनार सहा आठ म्हयन्यात का न्हाई? अजूनबी ते मागा मागा धरून बसतील मला काय ठावं?

संध्याकाळला म्यां तात्यानला म्हनलं, "काय वो? अजून ग्रेट बनवून झाली न्हाई अमेरिका?"

तात्या परत हासत सुटले..

"अगं माझे बाय! असं एका दमात काम संपवलं तर पुढची तीन वर्ष काय बोलनार न करनार म्यां? लोकानला इशय लयच आवडतोय हा. पुरवून पुरवून वापरत ऱ्हायचा न काय!"

राजकारन्यांचं डोस्कं कसं चालतं कुनाला कळलंय कधी?

"अनं अमेरिकाच न्हाई, म्यां तर दुन्येला ग्रेट बनवीन परत.. फकस्त काय हाए, विलेक्शनमध्ये ते कुनी वोट देत न्हाईत. न्हाईतर मेक दुनिया ग्रेट अगेन नसतं म्हनलं म्यां?"

"म्हनजे माडा?"

तात्यानचं काय? समद्या दुन्येची एक ग्रांपंचायत असती तर म्हनतील बी तसं कायतरी! पुढारीच ते. घोशणा द्याया मागेपुढं पाहतील? अन म्हनतील बी, 'मागा मागा हवं ते! म्यां हाए ना!'

# १०.



## *व्हेनेझुएला.. एक दगड दोन पक्षी!*

तात्यानची येक लै वाईट सवै हाए. तशा इतरबी लै हाएत. येकच हाए असं थोडीच? पन आता म्यां सांगते ती ही, तात्यानचा कायबी नेम न्हाई. कधीबी येतात न कुनाकुनाला घ्यून डायरेक घरला येतात. चापान्याला म्हनून येतात न जेवल्याबिगर हलत न्हाईत. तात्यानचा आग्रह त्यात. म्हनतात, मिल्यूच्या हातचं चुलीवरलं जेवन खाऊन बघा, बोटं चाखत ऱ्हाल. आता हे हरबऱ्याच्या झाडावर चढवनं काय चुलीत घालनार म्यां? अन आता म्यां इत्की वर्ष काय सोत्ता जेवन बनवनारे? फस्स लेडी न चुलीत फुंक मारत बसलीय? कसं दिसंल ते? अन तसं रांधाया यायला बी पाह्यजे का न्हाई? फस्स लेडी व्हन्याच्या अगुदर बी म्यां खानसामे हेरून ठेवलेले. त्यानला फोन फिरवायचा न ते किचनमध्ये यून

हजर. आता डब्बल डबोलं मिळालं तर कुनीबी यील का न्हाई? तात्यानला सुगावा लागू न्हाई दिला म्हनजे झालं. त्यानला वाटतं ही मेल्यानिया कशी सुगरन हाए न काय!

तर तात्यानबरोबर कोन कोन असावं? कुनीबी असतं.. म्हनजे गावचं कुनी नायतर भाएरचं कुनीकुनी. दुसऱ्या गावचं कुनी नि दूरदेशातलं कुनी. म्यां पांढ्र्या घरला आली तर इकडं येक पक्का खानसामा हाए म्हनून ठीक न्हाईतर एकेकाला काय खायाला घालनार? म्हनजे इंड्यातनं कुनी आला तर त्याला येगळं नि तो पुतीनभौ आला तर येगळं. तो बारक्या डोल्याचा क्षी आला तर वटवाघळं पकडून चटनी बनवाया येळ तर लागनार का न्हाई? पन तात्याना कोन सांगनार? सांगितलं तर न्हनायचे, अगं अशी लोकानची सरबराई केल्याबिगर मोठं व्हतं कुनी?

म्यां म्हनते, झाले की मोठं आता. सुप्परमॅन. आता काय आकाशायेवढं व्हायचं? सुपरसे उपर? पन तात्यानशी कोन वाद लावनार? तात्या कशातबी हारत नसतात तर वाद घालन्यात हारतील?

येकदा बोलले,'मेल्यू, बिर्यानी बनव मस्त..'

'का वो? कोन पाव्हनं येनार म्हनते मी..'

'कुनी का असंना, अन खाया कायबी बनव, मीठ टाक म्हनजे झालं!'

म्यां म्हनली, 'या बया! मीठ टाकल्यबिगर बिर्यानी बनते व्हय? त्यात सांगन्यासारखं काय हाए?'

यावर त्यानी काय सांगावं? म्हनले, 'अगं आपल्या घरचं मीठ खाया घातलं की ठणकावून सांगता येत न्हवं.. या तात्यानचं मीठ खाल्लंय बाबा, त्या मिठाला जाग!' तात्याबी ना असे हाएत! सगळीकडं असं राजकारन न हिशोब दिसतो त्यानला! राजकारनी म्हनलं का असाच असनार न काय! येनारे बी येकयेक असले असली असतात.. पन तात्यानपुढं न्हाई म्हना! तर पॉइण हा की तात्यानचं असं समदं कॅलक्युलेशन असतं. ते म्हनतात बी, 'म्यां पक्का व्यापारी. जिथं फायदा तिथंच म्यां. कायबी करायचं न्हाई ज्यात फायदा न्हाई. नफा व्हाया हवाच.'

'तर वो! म्हनून माझ्यासंगत लगीन केलं न्हवं?'

'तर! तो तर समद्यात फायद्याचा सौदा न काय! तुझ्याबिगर हे पांढ्रं घर पांढ्रं ऱ्हायलं असतं का?'

'चला! तुम्ही उगा मला हरभऱ्याच्या झाडावर चढवून ऱ्हायले म्हना की!' म्यां लाजत म्हनलेली.

'उगा कसलं गं बाई? उगा न्हाई.. उगी उगी!' जनू म्यां रडत व्हती असे तात्या मला शांत कराया बोलले! काय बी!

तर सांगत व्हते ते आजचे स्पेशल पाव्हने!

तात्या घरला आले तर गानं बोलत. 'कुनीतरी येनार येनार रं..' बाकी समदं पर्वडतं पन तात्यानचं गानं बोलनं? ते न्हाई आइकवत. कुनी म्हनेल बेडकावानी

आवाजात गातात ते तर कुनी रेड्ूयावानी. म्हनजे एक हाए, मानसावानी न्हाई आवाज याबद्दल तर येकमत न काय!

म्हनलं "काय वो? कोन येनार हाए? लय खुशीत गाडं!"

ते म्हनले, "तर गं! वाटतं आषाढ म्हयना हाए!"

"या बया! आषाढ? न तो आता? अवं तो सरून किती म्हयनं हून गेले. दिवाळी बी सरली, नाताळ बी. नवीन वरीस आलं न आषाढ?"

"तर गं! साधुसंत येती घरा तो दिवाळी दसरा! तसं हाए हे!"

तात्या काय कशाबद्दल बोलतात कळनं लय कठीन. असंल कायतरी लाजिक म्हनून म्यां कायबी इचारत न्हाई. इक्त्या वर्षात सवै झालीय. त्यानला सांगायचं तर सांगतील, न्हाई तर न्हाई! येक हाए तात्यानबरोबर कुनी साधुसंत येनार म्हनत असतील तर बहुतेक तात्यानी साधु न संत शब्दांचा अर्थ बदलवून घेतला असनार! तात्याच ते, कायबी करू शकतात न काय!

"कोन येनार पाव्हनं म्हनायचं? न्हाई म्हनजे तशी तयारी कराया.." म्यां तरीबी इचारलंच.

"अगं मेल्यू, लय मोठं सप्राईझ हाय म्हन की. काय हाए असं न्हेमी व्हत नसतं."

या बया! हे कोडं तात्यानचं. म्यां येडी काय सोडवनार? जाव दे म्हनलं. समजेल कवा न कवा. म्हनजे दिसंलच ना ते लवकरच. येनारे कुनी काय लपून ऱ्हातात?

म्यां इचार कराया लागली, म्हनलं, इत्के खुशीत का बरं हाएत तात्या? आषाढ म्हयन्याचा काय संबंध? तो कुनी कालिदास लिहून गेलता म्हने, आषाढाच्या पह्यल्या दिवशी त्याला त्याच्या बायकोची आठवन येते न ढगाला म्हनतो तो, अरं ढगा, तुला लागंल कळ नि माझ्या बायकोजवळ जाऊन काढ की तिची कळ! म्हने विरह सोसत न्हाई कशी कळ काढू म्हने! या बया! म्हनजे तीच इटालीवाली मेलोनी तर न्हाई? कळलावी? मला लय टेनशन यायला लागलं. का कुनी दुसरी परदेशी सटवी तर न्हाई ना येनार? ती इटालीवाली न्हाईतर दुसऱ्या कुठल्या देशामधली? म्यां मनाशी म्हनलं, कितीबी बिझी असू दे म्यां, नवीन झगं शोधन्यात, पांढ्रं घर पांढ्रं ठेवन्यात नायतर फ्याशन टीव्हीवर बायकांचे कपडे शोधन्यात, जरा तात्यानच्याकडे ध्यान ठेवायाच हवं. काय नाय तर थोड्या बातम्या तरी आइकायला हव्या.

पन आता काय? म्हनलं न्हाई, असं काय असंल तर तात्या असं माझ्यासमोर सांगत नाचायचे न्हाईत. पन मग हाए तर काय हाए?

तात्या परत म्हनले, "डार्लिंग मेल्यू, अगं आषाढ हाए!"

परत तेच! म्हातारचळ म्हनतात तो हाच का काय? असंल बी. पन 'अभी तो मैं जवान हुं' गानं बोलत तात्या नाचले त्याला लय दिवस न्हाई झाले. म्हनजे लय मोठमोठ्या लोकानची पार्टी व्हती. त्यात तात्यानी म्हनलं, 'एकतर म्यां गानं बोलतो न्हायतर नाचतो.' समदे एकादमात बोललेले, 'तुमचा डानस बघाया आवडेल लय आम्हाला!' तात्या लय खुश झाले! त्यानला म्हायती नाय पडलं, गानं बोलतील ते कोण सहन करनार? डानस पर्वडला! डोळे मिटून घेता येतात

कुनाच्याबी नकळत! तर तात्यानी डानस कशावर करावा? अभी तो मैं जवान हुं म्हने!

विशय तो न्हाई पन.

"काय वो हे आषाढ आषाढ काय लावलंय आल्याधरनं?" म्यां करवादली. पन तात्या बरफावानी शांत.

"अगं तुला न्हाई समजायचं न उमगायच! आषाढ हाए! तळाया घे!"

तशी आमच्याकडं पद्धत हाए, आषाढ तळायचा म्हनजे भजी न पकोडे न वडे न पापड, तळून खायचं समदं आषाढ म्हयन्यात. एकेक पद्धत न काय! तसं पद्धती पाळन्याचं तात्याना काय बी पडलेलं नसतं, पन खाया मिळतंय तर पाळनार पद्धत न काय!

"या बया! तळायला घ्यू म्हनता? पन तेलाचे भाव ठावं हाएत ना? धा तोंडं जेवाया येनार तर अरबट चरबट हानतील समदे किती? दिवाळं वाजेल अशानं.."

"मेल्यू, मेल्यू.. तुला कसं सांगू? पन येकच सांगतो, ते तेलाची चिंता करायचे दिस गेले आता. अभी तो मैं तेलवान हुं.."

"बस बस!" तात्यानचं गानं म्हनजे कानावर अत्याचार..

तेलवान! गंगू तेली जनू! नाय नाय! राजा भोज कधी गंगू तेली बनंल का काय? पन तात्यानचं गौडवॉशिंगटन काय उमगना मला. आषाढ काय, तेलवान काय, न कुनीतरी येनार म्हनून खुशीत काय? मला सांगा, कुठल्या बायकोला

लगिनानंतर इक्त्या वर्षानीही आपला नवरा इत्ता खुशीत ऱ्हायलेला सहन व्हईल? पन म्यां काय करनार? गप ऱ्हाऊन किचनात ऑरडर सोडाया गेली. म्हनलं होलसेल घ्या तळाया. वडे न भज्या, पापड न कुरडया. खानसाम्यांना कामाला लावून म्यां आपल्या तयारीला लागली. तिसरी बायको योजनेचा नवा झगा आलता म्हनून बरंच झालं की, उगा डरेस शोधन्यात येळ नको वाया जायला.

म्यां अशी बसलेली तर भाएर बईलगाडी थांबन्याचा आवाज. बईलांच्या गळ्यातली घुंगरं कानाला ग्वाड वाटतात. ती वाजायची थांबली. कोनीतरी उतरलं आतनं. म्यां पाहते तो दोन जनं..

"मेल्यानिया, हे मादुरो अन मिसेस सिलिया मादुरो.."

या बया! हे कोन म्हनायचं? हे येनार म्हनून तात्या इत्ते खुशीत व्हते?

"कुठनं आलं पाव्हनं म्हनायचं?" म्यां इचारलं.

"अगं कुठनं काय? व्हेनेझुएला ग्रांपंचायतीचे सर्पंच. व्हते."

"व्हते म्हनजे?"

"म्हनजे आता न्हाईत! काल व्हते! साधं व्याकरन हाए.. आता इकडे बोलावून घेतलं म्यां.."

मग लय गप्पाटप्पा झाल्या. अरबट चरबट तळलेलं खाणं झालं. पकोडे पन कशाकशाचे बनू शकतात न्हाई? कांदा बटाटा तर न्हेमीचे कलाकार, पन बैंगन, कोबी, पनीर, पालक न काय काय न्हाई तळून काढलं भजीच्या पिठात डुबवून! किती तेलाचा फडशा पाडला कुनास ठावं. खाऊन पिऊन ती दोघं जायाला निघाले तर तात्या बोलले, "तिकडं आऊटहौसला सोय केलीय. ऱ्हा निवांत. कुनाला कानोकान खबर न्हाई जानार न कुनी डिस्टर्ब करनार.."

ते गेले न म्यां म्हनाली, "हे आता इकडेच ऱ्हानार? त्यानची सर्पंचकी?"

तात्या त्यावर हसाया लागले..

"तुला काय काय सांगू मेल्यू?"

मग तात्यानी काय काय सांगितलंच!

व्हेनेझुएलातनं तात्यानी त्या मादुरोला बोलावून घेतलं. मिसीस सकट. म्हने आता ते इकडंच ऱ्हानार. तिकडे कुनीतरी तात्यानच्या मरजीतला सर्पंच बसवनार.. कां? तर म्हने व्हेनेझुएलात लय तेल हाए! तात्यानी सौदा केला न आता तेलाची चिंता मिटली! म्हनून म्हने तळण काढलं.. आषाढ म्हने! हवं तितकं तेल मिळनार आता! चांगलं हाए! अरबट चरबट खायला आता मोकळं रान न काय!

पन आज सर्प्राइझ इत्तंच न्हाई. एकेक दिवस असा उगवतो की एकामागनं एक चांगलं कायतरी घडत ऱ्हातं.. ते घडलंच! तात्याना म्हने ठावं होतं.

म्हनजे झालं काय ना..

ते मादुरो न सिलिया खात बसलेले. खात कसले, हादडत बसलेले. तात्या घड्याळ पहाया लागले. मादुरोभौला इशारा कळला असनार. तवा दोघंबी पटपट निघून गेले. न धा मिन्टात दाराशी हेलिकॉप्टर!

त्यातून कोन यावं? तर येक तरणी बाई!

आता मला बरं वाटतंय, पन तवा? तवा त्या बाईला पाहून धडधड व्हाया लागलेली. म्हनलं आता ही बया माझ्या डोईवर बसवनार का काय? तसं तात्यानी शब्द दिलता, कुनी चवथी आननार न्हाई म्हनून. पण राजकारन्याचा शब्द तो! किती इश्वास ठेवायचा?

पन न्हाई, ती बया तशी न्हवती.

ती आली, तिच्या मागं पेपरवाले नि कॅमेरा घ्यून टीव्हीवाले आले. ती तात्यानजवळ येत म्हनली, "समद्या जगाची आशा ज्यानवर हाए अशा सर्पंच तात्याना भेटाया म्यां मुद्दाम आली हाए. जगात शांतता ऱ्हावी असं वाटत असंल तर येकच मानूस ते घडवू शकतो.."

मला शाळंची आठवन यून हसाया आलं. तवा कसं, समद्या वर्गात मस्तीखोर असंल त्याला मॉनिटर बनवून टाकलं की वर्ग शांत ऱ्हायचा तसं कायतरी!

"म्हनून म्यां हे शांततेचं नोबेल प्राईझ सोत्ताच्या हाताने द्यायला आली हाए.."

ही मारिया मचाडो! व्हेनेझुएलावाली बया जिला तात्याना सोडून नोबेल प्राईझ दिलतं त्या नोबेलवाल्यांनी. तेच ती द्याया सोता आलेली! तात्यानी बी ते नोबेल का काय हाती घेतलं नि पेपर न टीव्हीवाल्यानला फोटो दिले. म्हनले, "म्यां अन जगातील शांतता, येकाच नाण्याच्या दोन बाजू हाएत! नोबेलवाल्यानला न्हाई पन मचाडोताईला कळलं!"

ताई! तात्या हे बोलले न म्यां एक जोरात श्वास सोडला.

म्यां म्हनलं, तात्यानची दोन स्वप्नं झटक्यात पुरी झाली की! एक तर तेल मिळंल हवं तितकं नि हे! शांततेचं नोबेल! दोन्हीबी एका मागे एक. अन एकाच व्हेनेझुएलातनं यावीत. म्यां असं म्हनली तर तात्या म्हनतील,

'न्हाई.. असं आपसूक काय बी येत नसतं. त्यासाठी म्हेनत लागते.'

तात्यानी केलं असनारच साम, दाम, दंड न भेद! त्यातनं मिळवलं असनार जे हवं ते. एकच व्हेनेझुएला ग्रांपंचायत नि दोन बक्षिसं! एकाच येळेला. एक दगडात दोन पक्षी जनू!

समदे गेले न सामसूम झाली. रातीला तात्या लय निवांत घोरत निजलेले. म्हनले, झोपेत किती निरागस दिसत्यात अजूनबी! अन जागे झाले की? मध्येच तान्ह्या बाळावानी ते खुदकन हासले. म्हनलं एक स्वप्न पुरं झालं त्याचा आनंद असेल? का न्हाईतर आता नवं कायतरी स्वप्न पाहात असतील ते. कायतरी ग्रीनलँड ग्रांपंचायतीबद्दल बोलत व्हते कुनाशी तरी.. त्याबद्दल तर नसेल? कायबी असू शकतं! पन म्हनलं, एका दगडात दोन की चार पक्षी मारोत ते! काय बी असो.. तात्या खुश तर म्यां खुश!

# ११.



## *तात्यापन नि हत्ती!*

त्या दिवसाची गोश्ट. अशी म्यां गावच्या जत्रेतनं चाललेली. नवा झगा न नवी ब्याग हातात. तात्या लय म्हनजे लय बिझी असतात आजकाल. ते कधीबी येत न्हाईत तिकडे. म्हनतात, तू हैस ना. मग म्यां कशाला? तसं त्यानचं बरोबर हाए, दुन्येचा कारभार चालवनं काय सोपं काम हाए?

गावची दर म्हयन्याची जत्रा तशी मला लय आवडते म्हना. नव झगा न ब्यागा घ्यून मिरवायचं न काय! फस्स लेडी म्हनून ड्यूटी बी ती माझी. म्हनजे मिरवनं बी अन ड्यूटी बी! तर अशी जत्रेतनं चाललेली तर येक मानूस जवळ आला न म्हनला,

'मेल्यानियाबाई ना तुम्ही?'

अभिमानानं म्हनलं, 'हो. म्यांच फस्स लेडी!'

तर तो कोपरापासनं हात जोडत म्हनला,

'ट्रंपत्वाची जेथ प्रचीती

तेथे कर माझे जुळती!'

म्यां पन हात जोडले. कोपरापास्नं न्हाई फकस्त.

इचार केला न मनाशी म्हनले, लोकानच्या ध्यानी मनी नि स्वप्नी फकस्त तात्याच हायेत आजकाल न काय. असनार न्हाई तर काय? जिकडं जावं तिकडं तात्यानचाच बोलबाला. त्यानचं करतूत न कर्तुत्वच तसं हाए!

ट्रंपत्व! म्यां म्हनलं ट्रंपत्व शब्द चांगला हाए. खरतंर तात्यापन म्हनाया हवं. तात्यापन! बालपन, शहानपन म्हनतात तसं कायतरी! न्हाई, तसंच कायतरी. तात्यानचं तात्यापन!

तात्यांचं तात्यापन कशात असंल?

म्यां इत्की वर्षं वळखते त्यानला. अगदी वळखून हाए म्हना ना! तात्यानचं तात्यापन म्हनजे त्यानच्या अंगाला चिकटलेली चामडी जनू. ती येगळी व्हनार कशी?

अगदी त्यानची न माझी जोडी जमली तवा पास्न आजतवर बघत आलीया म्यां. ते तसेच हाएत. ज्यावर भाळलेली म्यां ते रंगेलपन. अजूनबी तसंच हाए. म्हनून तर गावोगावी फिरतात ते न इकडे बाकबूक माझ्या छातीत व्हत ऱ्हाती. त्यानची काय चूक? असला राजबिंडा न सुपरम्यानवानी कुनी पुरूश समोर आला तर तिकडल्या बाया वेडावनार न्हाईत तर काय? म्यां एकदा म्हनलेली त्यानला, 'या वयात बी तुम्ही लय हँडसम हाएत..' मला वाटलं ते खूश व्हतील. पन उलट चिडले न म्हनले, 'या वयात म्हनजे काय मेल्यू? अगं, अभी तो मैं जवान हुं!' कुठनं कुठनं असली गानी आइकून येतात कुनास ठावं! तसे तर रंगेलपनासोबत रगेल बी हाएत. ते म्यां सांगावं असं न्हाई. दुन्या बघतेय ना अजूनबी! त्यानचा रगेलपना पार जवानीपास्नं हाए. ते सोत्ताला अजूनबी जवान समजतात ही गोश्ट येगळी! कुनाला नाकावर ठोसा देतील न कुनाच्या पाठीत बुक्की हानतील. त्यानच्या समद्या गोश्टीत येक बाब असतीच, ती म्हनजे ते लय म्हनजे लयच हुशार हाएत. म्यां तर म्हनते आज घडीला दुन्येतले तेच हुश्शार नंबर वन असनार! असनार म्हनजे हाएतच! आठ धा म्हयन्यात पुऱ्या दुन्येत ज्याने सोत्ताचा बोलबाला घडवून आनला तो मानूस अलम दुन्येतला नंबर वन हुशारच असनार का न्हाई? त्यामुळे त्यानला आपलं खरं, न्हाई, आपलंच खरं वाटत असंल तर त्यानची काय चूक? तेच खरंतर खरं हाए! आता कुनी याला हेकेखोरपना म्हनत असतील तर ते तरी काय करनार? म्यां तर जत्रेत लोकानला हे बी म्हनताना आइकलंय, 'आलं ट्रंपोजीच्या मना तिथं कोनाचं चालेना!' काय खोटं हाए ह्यात? त्यानचं हमेशा खरंच असंल तर ते सांगतील तसंच व्हायला

नको? द्येवाच्या खालोखाल ते असतील तर त्यानची त्यात चूक न्हाई. ते म्हनतात बी, 'मेल्यू, वॉशिंगटनाला ग्रेट बनवाया माझा जल्म.'

म्यां म्हनली बी, 'सासूबाईना इत्का अभिमान वाटत असंल!' तर म्हनले, 'अगं माझी माय फकस्त निमित्त बरं! मला तर वाटतं द्येवानं मला डायरेक धाडलंय इकडं! आता ते काम कराया हवं.'

म्यां म्हनले, 'ते तर करताय तुम्ही. किती धावाधाव न पळापळ. पायाला भिंगरी लागल्यागत. आज इकडं तर उद्याला तिकडं..'

'आपलं काम हाए तर कराया नको? द्येवानं धाडलं ज्याकरता ते करायाच हवं. पन लोक काय, चुका काढाया मागंपुढं पाहात न्हाईत. मला सांग, डायरेक द्येवाघरचा मानूस म्यां! म्यां कसा काय चूक करनार? लोकानला समजाया हवं. म्यां म्हनतो ते निमूट आइकाया हवं!' तात्यानचं हे आनखीन एक. उगा सवाल नगं. जुनी गोश्ट. म्यां तमाशाच्या बारीवर असायची. नवी नवी वळख झालेली. तात्यानवर म्यां अन ते माझ्यावर भाळलेले. येकदा झालं असं की, तमाशात ते सवालजवाब असतात का न्हाई, तात्या ते आइकत बसलेले. कार्येक्रम संपला न तात्या भेटाया आले. न्हेमीवानी खुशीत दिसत न्हवते. म्हनलं, 'आवडला न्हाई का डान्स?' तर म्हने, 'डान्स नंबर येक! तू बी नंवर येक! पन मला येक बाब आवडत न्हाई, सवाल जवाब!'

'का वं?'

'अगं, मला कुनी प्रश्न इचारलेला न्हाई पटत, आवडत न खपत! शाळंत बी मला परीक्षा आवडायच्या न्हाईत. कुनी उगा काहीबाही इचारतोय? कशाला? तू तमाशा सुरू ठेव पन हा सवालजवाब नको!'

त्यानंतर तो सवालजवाब म्यां बंद केला. सवाल इचारनाऱ्या सायन्सचा म्हनूनच त्यानला तिटकारा हाए. म्हनतात, 'सायन्स असलं तिरपागडं शिकवतं लोकानला. म्हने इचार करा न सवाल इचारा! कशापाई?'

त्यानचं येकच, ते म्हनतील ती पूर्व दिशा. अन चिमित्कार बघा, त्या दिशेतूनच सूर्य उगवतो. त्यानचं असं अगदी सूर्यद्येव बी आइकत असेल तर प्रुथ्वीवरल्या मानसांनं बी आइकायला हवं का न्हाई? पेपरवाले न टीव्हीवाले उगा माइकचं बोंडूक पुढं करून सवाल कराया लागले की ते कावतात. येकदा म्हनले बी, 'हे पेपरवाले टीव्हीवाले पत्रकार म्हनजे येक ब्याद बघ. सोत्ताला लय शाणे समजतात न उगा काहीबाही इचारतात म्हनजे काय! म्यां तर म्हनतो दुन्येत काहीकाही गावांत तर तिकडलं सर्पंच यानला भेटत तर न्हाई नि एक शब्द बोलतबी न्हाईत त्यानच्याशी. म्यां निदान बोलत न्हाई असं न्हाई करत. पन हे लोक काय समजतात सोत्ताला? मायला यानच्या हातात न्हाई येक बी पावर अन दिमाख कसला? हाती न्हाई तरवार न म्हने मला बाजीराव म्हना!'

तात्यानचं खरं हाए! ज्याच्या हातात पावर तोच खरा का न्हाई! तव्हा त्यानचं समदं खरंच असतं हे ठावं हाए मला.

अन येक सांगते, तात्यानचा हिशेब चोख. समद्या बाबीत त्यानचा हिशेब एकदम चोख. म्हनजे कशातूनबी फायदा कसा न किती मिळनार याचा चोख

हिशेब. मग तो पैशाचा असू दे का राजकारनाचा! 'मत मिळवनं नि पैसा मिळवनं दोन्हीचा हिशेब पक्का ठेवतो म्यां. अन तुला सांगू मेल्यू, एकातनं दुसरं न दुसऱ्यातनं पहीलं मिळत असतं!' असंल बाई!

'म्यां अडानी बाई, मला काय कळतं' असं म्हनली तर तात्या म्हनतात, 'तुला काय चिंता मेल्यू? म्यां हाय ना!' ते तर हाएतच! त्यानचा असा जब्बर आत्मइश्वास हाय. तसा त्यानचा सोत्ता सोडून दुसऱ्या कुनावरच इश्वास न्हाई तर ऱ्हायला इश्वास येकच, आत्मइश्वास न काय! त्यामुळे कुनाला वाटतं ते बढाईखोर हाएत का काय! तसे ते न्हाईत पन. बढाईखोर कुनाला म्हनतात? जे उगा सांगतात आपलीच महती त्यानला. तात्या उगाच न्हाई, आपली कर्तुत खरंच सांगत असतील तर बढाई कसं म्हनावं त्यास? पन काही लोकानला बरं बघवत न्हाई, त्याला काय करनार?

म्यां म्हनते तात्या पक्के व्यापारी हाएत. कुठं कधी पैसा लावावा की तो वाढेल हे समजतं पक्कं त्यानला. न पैशाप्रमानंच बाकी बी! ते म्हनतात, 'माझ्याकडं पैशाचं झाड हाए मेल्यू. ते वाढवायचं कसं नि त्यावर पैशे उगवायचे कसे हे ठावं हाए मला!' ते खरंच हाए! राजकारनात बी कसलं बी पेरलं की कसलं पीक यील न वोटांची बेगमी व्हईल याचा अंदाज चुकत न्हाई त्यानचा. उगाच का या उगाचची लोकशाही मिरवनाऱ्या वॉशिंगटनात ते दुसरूंदा सर्पंच झाले. 'मेल्यू म्यां पक्का हिशेबी हाए. नोटांचा न वोटांचा हिशेब चुकायचा न्हाई माझा!' आता दुन्येभरात फेमस असलेल्या सुपरम्यानचं हे बोलनं खरं न्हाई असं कसं म्हनावं कुनी? त्यातनंच तर ते आज हितं पांढ्र्या घरात परत पोहोचलेत.

आता सुपरम्यान म्हनलं की इकडंतिकडं चर्चा व्हनारच. लोक चार त्वंडानी बोलनारच. धा लोक चांगलं बोलले की एक जन वंगाळ बोलनारच! मनुश्य स्वभाव न काय! अन मोठ्या मानसाबद्दल बाता बी मोठ्याच मारनार लोक. तात्या न त्यानचं तात्यापन! त्यानच्या इत्कंच फेमस हाए ते तात्यापन न काय! म्यां म्हनते हे तात्यापन काय हाए? कुनाला काही दिसतं कुनाला काही. माझ्याइतकं जवळून कुनी पाह्यलं नसेल म्हनून सांगते, हे म्हनजे त्या हत्तीच्या गोश्टीवानी हाए. म्हनजे कुनाला सोंड दिसते तर कुनाला पाय. कुनाला कान तर कुनाला दात. पन हे का व्हतं? हत्ती चिमुकला असता तर? तसंच तात्यानचं न्हाई का? येवढा मोठ्ठा मानूस हाए तर दिसनारच का न्हाई येगळा येगळा कुनाकुनाला. तरीबी समद्यांचं खरं म्हनावं न खोटं बी म्हनावं! येकाच येळेस खरं बी न खोटं बी? का न्हाई? तात्या हाएत तर कायबी शक्य हाए का न्हाई? विलेक्शनच्या टायमाला न्हाई का म्हनलेलं, तात्या है तो मुमकिन है!

हे काय बी होऊ शकतं हेच तर हाए तात्यापन! कुनी ट्रंपत्व म्हनेल कुनी तात्यापन म्हनेल. पन हीच तर हाए तात्यानची खासियत न काय! त्या गोश्टीतल्या हत्तीवानी!



# डॉ. नितीन मोरे

यांची

६१

प्रकाशित पुस्तके

























डॉ. नितीन मोरे


लाडोबा
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
INSTANT
कालिदास


मिशन


डॉ. नितीन मोरे
तेवढं सोडून बोला
एकपात्री
नाटक


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
प्रेमाचे


कोविडकथा


डॉ. नितीन मोरे
न केलेली भाषणे

## चक्रमादित्य भाग १ ते ५




























डॉ. नितीन मोरे
Version 2.0.2.0


डॉ. नितीन मोरे
HOSTEL-I

डॉ. नितीन मोरे
शाणपट्टी


डॉ. नितीन मोरे
एका नाटकाची गोष्ट!

डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे




डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा ४
कर्ण.. जाड्या.. चक्रधर..इ..






राग दरबारी


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे


आधुनिक कहाण्या








डॉ. नितीन मोरे
घरात


डॉ. नितीन मोरे


सांगतो
ऐका


डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे




डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
आहे
हे
असं आहे!


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते

डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
'इका'गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची
'परी'कथा


डॉ. नितीन मोरे
ऐसी
अक्षरे


Jackson!


सुलट


डॉ. नितीन मोरे
ऑर्वेलच्या फार्मात!

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे अठरावे वर्ष

# डॉ. नितीन मोरे यांचे हे बासष्टावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे यांचे मनःपूर्वक अभिनंदन. डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. ते बालसाहित्यही लिहितात आणि तरुणांसाठीही. गंभीरही लिहितात आणि विनोदीही. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), **डॉ. नितीन मोरे (६२ पुस्तके)**, अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (३), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (२३), मधू शिरगांवकर (८), **अशोक कोठारे (१०००० पानी महाभारत)**, **श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ)**, मोहन

मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१२), **डॉ. वृषाली जोशी- जागतिक वाङ्मय अनुवाद (६१ पुस्तके)**, डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४०), आनंद देशपांडे (३), डॉ. नीलिमा कुलकर्णी (५), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१५), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), **श्याम कुलकर्णी -मूळ वाल्मिकी रामायण(३०)**, किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (८), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, **डॉ. सरोज सहस्रबुद्धे- वैद्यक विज्ञान(१६),** अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम(११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखान्नीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक(३), श्रीराम काळे (८), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी(४), रामकृष्ण बाक्रे(३), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(४), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत(२), अशोक बेंडखळे(५), सुहास साने, सुवर्णा लेले, **प्राचार्य शशिकांत कर्डेकर**(१४ भूगोल विज्ञान विषयक), स्वाती वर्तक, भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), दिगंबर सलगर(४), कैलास बडगुजर, **श्रीपाद काळे- समग्र ऋग्वेद(१०)**, वैभव पाटील, चारुलता काळे, अनिल शिणगारे, स्वाती वर्तक(२), प्रमोद नाईकवाडे, सुधीर शास्त्री, रुपेश मराठे, सुप्रिया उपाध्ये, संजीवनी कुलकर्णी, मनोहर सुरवाडे(३), श्रेणिक सारडे (६), दिलिप ठाकूर, धनंजय कुलकर्णी, मिलिंद चौधरी, जोसेफ तुस्कानो, सुभाष धारणकर, सचिन कुल्ली(३),

विश्वनाथ मानकर, अर्चना सहस्रबुद्धे असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं "ई"यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

esahity@gmail.com

www.esahity.com

**9869674820** (for free books on whatsapp)